ॐ

# उदात्त-वाणी.

कवि- श्री. उत्साहतीर्थ महाजन.

प्रकाशक—रा. रा. वि. कृ. नेरूरकर बी. ए.
मालवण, जि. रत्नागिरी.

मुद्रक—रा. रा. कृ. सी. देसाई, 'श्री भगीरथ प्रेस,
मालवण.

[ सर्व हक्क स्वाधीन. ]

-श्रावण शके १८४५.

किंमत ८ आणे.

REFBK-0002368

# शुद्धिपत्र *

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २० | १७ | सुवेळा अशी | मनीषा मनीं |
| २० | १९ | १८४२ | १८४४ |
| २२ | १४ | होईल | होईन |
| २६ | २३ | माघ | चैत्र |
| २८ | १७ | व० १४ | व० १२ |
| ३० | १४ | १८४६ | १८४३ |
| ३३ | १२ | आश्विन १८३४ | कार्तिक १८४३ |
| ४२ | १९ | शु० ३० – | शु० ८ |
| ५३ | १५ | मौर्ख्य तें करा सब दूर | जममौर्ख्य करावा दूर |
| ६० | २१ | १८४१ | १८४३ |
| ८५ | ५ | ज्येष्ठ शु० ११ | आषाढ व० २ |
| ९६ | १६ | शु० ३ | शु० ६ |

*पृष्ठें ९३, ९४, ९५, ९६, यांत ९ च्या ऐवजीं १ चा आंकडा चुकून पडला आहे.

# अनुक्रमणिका.


| | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | परिचयादाखल. | ३ |
| २ | थोरांचे दोन शब्द. | ५ |
| ३ | उत्साह पाहिजे. | ६ |
| ४ | प्रस्तावना. | ७ |
| ५ | समर्पण. | ८ |
| ६ | ईशस्तवन. | ९ |
| ७ | वाचकांस आशीर्वाद. | ११ |
| ८ | कळकळीचे दोन शब्द. | १२ |
| ९ | प्रेमरूप परमात्म्यास | १३ |
| १० | व्हावि कशी प्रगति? | १३ |
| ११ | स्वहितकार' | १४ |
| १२ | वात्सल्य. | १६ |
| १३ | हें योग्य आहे काय? | १७ |
| १४ | प्रबोधन. | १८ |
| १५ | आर्यभूमातेस. | १९ |
| १६ | चला उद्यमाला. | २० |
| १७ | फोडित मीं हा टाहो! | २१ |
| १८ | खुला होईन काय? | २२ |
| १९ | विश्वाचा नकाशा. | २३ |
| २० | कसा होवो पण- .... | २५ |
| २१ | पाडवा--प्रतिज्ञा. | २६ |
| २२ | तुझें स्मरण. | २७ |
| २३ | भिकारी. | २८ |
| २४ | राणीचा बाग. | २९ |
| २५ | तारक तलवार. | ३१ |
| २६ | कोण कोणाचे नाहींत. | ३२ |
| २७ | घे गांधींचा बोध. | ३३ |
| २८ | आजकाल. | ३४ |
| २९ | भ्याला तो मेला. | ३५ |
| ३० | हृदयाचा निर्धार. | ३६ |
| ३१ | देवाचें वसतिस्थान. | ३७ |
| ३२ | विलक्षण स्वप्न. | ३८ |
| ३३ | असें हें मागगें. | ३९ |
| ३४ | झकापकी. | ४० |
| ३५ | हिंद उद्धराया. | ४१ |
| ३६ | वृथाचि जीवित. | ४२ |
| ३७ | विशिष्टता. | ४३ |
| ३८ | करुणास्पद स्थिति. | ४४ |
| ३९ | धर्म--वेड. | ४५ |
| ४० | नच गवसे! | ४६ |
| ४१ | संसाररतांस. | ४८ |
| ४२ | अहिंसाधर्म. | ५० |
| ४३ | सम्राट संन्यासी. | ५१ |
| ४४ | कवींस विनंति. | ५३ |
| ४५ | तुझी सत्ता! | ५४ |
| ४६ | माझा पुढील मार्ग. | ५६ |
| ४७ | ऊठ भारता! | ५८ |
| ४८ | जग हें द्विविध आहे. | ५९ |

| | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| ४९ | राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें. | ६१ |
| ५० | वसंत--वैभव. | ६५ |
| ५१ | भाविक मनाची गुणगुण. | ६६ |
| ५२ | अदृश्य सृष्टि. | ६७ |
| ५३ | माहेर घर! | ६९ |
| ५४ | कर्म--फल. | ७० |
| ५५ | तुजविणें मम जीवन हें कमी! | ७१ |
| ५६ | आत्मबल. | ७२ |
| ५७ | कां इथें रखडसी? | ७३ |
| ५८ | 'तो क्षण.' | ७४ |
| ५९ | नखऱ्यावर उतारा. | ७६ |
| ६० | सात्विक सृष्टिशोभा. | ७७ |
| ६१ | ग्रीष्म--गान. | ७८ |
| ६२ | मुरली-रव. | ७९ |
| ६३ | नको ऐशांचें तर्पण. | ८१ |
| ६४ | पैंवगा. | ८२ |
| ६५ | कांहींतरी. | ८३ |
| ६६ | लढाईवर जातांना. | ८४ |
| ६७ | गर्वा नको तूं चढूं! | ८५ |
| ६८ | स्वत्वाची जाणीव. | ८७ |
| ६९ | मिळव कीर्ति जगीं. | ८९ |
| ७० | नसे वेळ ऐशी पुन्हा यावयाची. | ९० |
| ७१ | शिमगा. | ९१ |
| ७२ | ऐक्यभाव. | ९२ |
| ७३ | देशासाठीं. | ९३ |
| ७४ | अनुकरण. | ९४ |
| ७५ | गुरुबोध. | ९५ |
| ७६ | कवि-भूप. | ९६ |

स.क्रमांक
९८८।२२

# परिचयादाखल —

" जळजळणारे शब्द आणि चैतन्ययुक्त विचार यांनीं परिप्लुत असलेलीं राष्ट्रगीतें एकत्र म्हणणें हा राष्ट्रैक्य साधण्याचा महत्वाचा भाग आहे. "

**स्वामी रामतीर्थ.**

वाचकांच्या हातांत दिलेली उदात्तवाणी लिहिणारे कवि उत्साहतीर्थ व त्यांची कविता यासंबंधीं परिचयादाखल थोडेंसें सांगितलें म्हणजे पुढील कवितांच्या वाचनांत एकदम बिचकल्यासारखें होणार नाहीं.

या पुस्तकांतील कवींच्या छायाचित्रावरून ते अद्याप बालवयामध्येंच आहेत हें सहज समजेल. विद्यार्थिदशेंत असल्यापासून त्यांना कविता लिहिण्याचा नाद फार. त्यांची फारच थोडी कविता नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेली आहे. त्यांचा कवितासंग्रह मोठा आहे. या पुस्तकांत त्यांतील थोडींशीं प्रकरणें घेतलीं आहेत. परंतु एवढ्यावरूनच त्यांच्या काव्यरचनेचा चांगला परिचय होण्यासारखा आहे.

काव्य, काव्यरचना आणि काव्याचें मर्म हे विषय नेहमींच वादग्रस्त आहेत. त्यासंबंधीं खोल, गूढ विचारांच्या डोहांत न उतरतांही वर उद्धृत-केलेल्या राष्ट्रगीतांच्या सदरांत उत्साहतीर्थांची कविता येईल असें वाटतें. त्यांच्या कवितेंत कल्पनेच्या भराऱ्या फारशा नाहींत, तसेंच रहस्यमय भावनाही नाहींत. साधी सरळ भाषा, अंतरात्म्याची कळकळ आणि स्पष्टोक्ति, कडक शब्द आणि चैतन्य युक्त विचार

हीं मात्र भरपूर आहेत. आजच्या कालांत आपल्या देशास असल्याच गाण्यांची जरूरी आहे हें तर उघडच आहे, व एवढ्या वरूनच हें गाण्याचें पुस्तक रसिकांच्या पुढ्यात ठेवण्याचें योजिलें आहे.

त्यांचें बालपण खेडेगांवांत गेलेलें असल्यामुळें प्रतिभा प्रसंगीं ऐन उमाळ्यांत असतां बाहेर पडलेले स्फूर्तीचे उद्गार आपल्या सहज स्वरूपांत बाहेर निघाले आहेत. त्यांत कृत्रिमता नाहीं. त्यांची कविता भाबडी पण अन्याय सहन न करणारी अशी रागीट आहे, निस्पृहतेच्या बाण्यांत ती क्वचित् रांकटही बनली आहे. एकंदरींत रामतीर्थांची कसोटी जर लावावयाची असली, तर उत्साहतीर्थांची कविता सरसच ठरेल. सरसनीरसता परिणामावरून अजमावणें जर रास्त असेल तर उत्साहतीर्थांची कविता कवि स्वतः ह्मणतात त्या प्रमाणें अनादरणीय होणार नाहीं अशी उमेद आहे.

रत्नागिरी जिल्हा काँग्रेस कमिटीमार्फत देवगड तालुक्यांत प्रचारकाचें काम त्यांनीं स्वेच्छेनें बरेंच केलेलें आहे. बऱ्याच गावांतून ते व्याख्यानें देत फिरले आहेत. राष्ट्रिय शाळांतून शिकविल्या जाणाऱ्या राष्ट्रीय गीतांच्या धर्तीची बहुतेक कविता असल्यामुळें राष्ट्रीय भावना व उत्साह ती निःसंशय जागृत करील.

मुख्याध्यापक
लोकमान्य शिक्षण संस्था
(राष्ट्रीय विद्यालय)
मालवण.

# थोरांचे दोन शब्द!

केयूरा न विभूषयंति पुरुषं हारा न चंद्रोज्वला ।
न स्नानं न विलेपनं न कुसुमं नालंकृता मूर्धजाः॥
वाण्येका समलंकरोति पुरुषं या संस्कृता धार्यते ।
क्षीयन्ते खलु भूषणानि सततं वाग्भूषणं भूषणम् ॥

[नीतिशतके भर्तृहरिः]

साध्या गोष्टींमधूनच उच्च कल्पनेच्या जोरावर त्रिकालाबाधित अशा सत्तत्वाचेंच प्रासादिक वाणीनें व गंभीर शब्दांनीं साधारण समजुतीच्या माणसास पटेल असें स्पष्टिकरण करणें हेंच उच्च दर्जाच्या कवितेंतील मर्म आहे. कवितेचें सर्वोत्तम व उदात्त ध्येय ह्मणजे सत्य, न्याय आणि धर्म या गोष्टींचा सदुपदेश ओजस्वी शद्बरचनेनें सामान्य जनतेला करणें हेंच असलें पाहिजे. कवितावाचन ह्मणजे एक केवळ करमणुकीचें साधन होय असा कित्येकांचा समज असला तरी तो अज्ञ जनांचा समज आहे. सत्य, न्याय, धर्म, नीति, व परमेश्वरावर श्रद्धा अशा प्रकारच्या ज्या अत्युच्च कल्पना मनुष्याच्या आत्मिक व मानसिक उन्नतीला अत्यंत आवश्यक आहेत, त्यांचेंच प्रतिबिंब कवितेच्या आरशामधून वाचकांच्या मनावर पडलें तरच ती कविता श्रेष्ठ दर्जाची ठरेल! वैयक्तिक आत्म्याची परमात्म्यापासून ताटातूट झाल्यामुळें मनुष्यप्राण्याची सर्व मानसिक धडपड परमात्म्याशीं पुनरपि संलग्न होण्यासाठीं चालली आहे हें तत्वज्ञानाचें अंतिम व गूढ प्रमेयच अत्यंत उच्च दर्जाच्या कवितेमधून प्रस्थापित होत असतें.

केशवसुतांचें चरित्र. [ सी. के. दामले. ]

# उत्साह पाहिजे!



निराशेचें नांव नाहींसें करून नरका-
चा नीच मार्ग सोडा! उत्साहाचा वा-
हता झरा हृदयोद्यानाला नेहमीं ओ-
लावा देत असूं द्या! प्रपंचाचा पंचप्राण
बनून त्यांतच आपली इतिश्री करून
घेऊं नका! हृदयांतील आत्मज्योति एकसारखी पाजळत ठेवून
सर्व जगाला चैतन्य पुरविण्याची हिम्मत बाळगून धडाडीनें
प्रयत्न चालूं द्या! सर्व सुखें समाधानानेंच मिळत असतात.
वस्तुविधाच्या प्राप्तीची हांव धरून तिच्यासाठीं आपलें सामर्थ्य
व उत्साह खर्ची घालूं नका! सर्व जगाला जागा करण्याइतका
आपला उत्साह जोरदार असला पाहिजे. मेंगे मारवाडी बनून
समाजाच्या कोना कोपऱ्यांत खिचपत पडूं नका! उत्साहानें पुढें
येऊन आपली कर्तबगारी जगाच्या निदर्शनास आणून द्या!
पुढें पाऊल टाकित राहील तोच वाट चालून जाणार आहे.

मुनिगांव.

भाद्रपद व० ६ शके १८४४.



उत्साहतीर्थ महाजन.

B. A. P. Works.

काव्य ८२३

# प्रस्तावना.

[ वृत्त—वसंततिलका. ]

जें ठेविलें लिहुनियां इतरीं जगांत ।
तें वाचुनी ऋण मला घडलें अनंत ॥
त्यांतील अल्पतर फेड स्वयें करावी ।
मीं हें ह्मणूनि जगतांत लिहूनि ठेवीं ॥ १ ॥
जे जेधवां स्वहृदयांत विचार आले ।
जे आपुले ह्मणुनि अंतरिं पाळियेले ॥
जें जेथ मीं हृदय-रम्य हि पाहियेलें ।
त्यांतील अल्प कवितेंतुनि व्यक्त केलें ॥ २ ॥
हा ऊंस मीं तव करीं दिधला असे कीं ।
काठी म्हणोनि नच बाजुस यास टाकीं ।
हा गोड ती भव तृषा शमवील वाटे ।
घ्यावा रस, त्यजुनियां वरचीं सलोटें ॥ ३ ॥
आहेत गूण बहु दोषहि फार यांत ।
नाहींच कांहिंहि तयांविण या जगांत ॥
ते सोडितील मग केविं मदीय वाणी ।
होईल आदर असेंच मनांत आणीं ॥ ४ ॥
ना या जगीं अजुनि उद्भवला अचूक ।
तेव्हां कशी मजकडून न होय चूक ॥
आहेत डाग रविला गुण गाढवाला ।
तेव्हां न हा कवि अनादरणीय झाला ॥ ५ ॥

मुनिगांव; कार्तिक शु० १२ शके १८४३.

# समर्पण.

[ दिंडी. ]

ग्रंथ ज्यांचे वाचितां एकभावें ।
हृदय माझें लेखनीं स्फुरण पावे ॥
गिरा ज्यांची हृदयास चेतवीते ।
सदा स्वत्वाचें स्मरण मना देते ॥ १ ॥
जयांकारण उत्साह मनीं वागे ।
सत्पदाला मिळवावयास जागे ॥
जयांकारण मम हृदय शुद्ध झालें ।
भीति दुबळे कुविचार निघुनि गेले ॥ २ ॥
मार्ग–दर्शक जे रामतीर्थ स्वामी ।
गुरू माझे मानिले जयांला मीं ॥
पदीं त्यांच्या नम्र जोडून पाणि ।
सादरें अर्पीं ही उदात्तवाणी ॥ ३ ॥

मुनिगांव; भाद्रपद व० १३ शके १८४४.

श्री.

2365 काव्य 623

# उदात्त वाणी.

## ईशस्तवन.

[राग—भूप, ताल—झंपा.]

अगम कर्तृत्व तव नाकळे ईश्वरा ! ॥ ध्रृ० ॥
विश्व मोठें किती ! । अगम त्याची मिती ॥
गुंग होते मति । कल्पितां तें जरा ॥ १ ॥
अंतराळीं वरी । गोल नानापरी ॥
तेजचिति शर्वरी । त्यांस नच आसरा ॥ २ ॥
तारका त्या किती ! । दिधलि नच त्यां गति ॥
रविचिया भोंवती । फिरत राहे इरा ॥ ३ ॥
तोय बघ भूमिसी । लिंपुनी ठेविसी ॥
लाट वर उसळिसी । गर्जना सागरा ! ॥ ४ ॥
जीव लक्षावधी । निर्मिसी त्यामधीं ॥
गणुनि जन ते कधीं । कोण होई पुरा ॥ ५ ॥
आलंब नच भूस । आकर्षि सलिलास ॥
होइ न पतन त्यांस । नवल जन अंतरा ॥ ६ ॥
करिसि राजे नवे । भ्रष्टविसि त्यां जवें ॥
आरमारी थवे । भक्ष्य ते सागरा ॥ ७ ॥
युद्ध भूमीवरी । होय नानापरी ॥
विजय कोणातरी । इच्छिसी प्रभुवरा ॥ ८ ॥
राज्य परकी जरी । आज अमुच्यावरी ॥
करिसि उद्यां दुरी । तेंहि विश्वंभरा ॥ ९ ॥

तूं स्वराज्य स्वयें । करिसि उद्यांहि हें ॥
करुं न तुज काय ये । काय वर्णी गिरा! ॥ १० ॥
गूढ कार्यें अशीं । कळति कोणा कशीं ॥
ठाउकीं तीं तुशीं । असति करुणाकरा ॥ ११ ॥
उत्साहतीर्थ तव । लीन पदिं त्यजुनि भव ॥
कारुण्य कर पाव । मजसि हे सुरवरा ॥ १२ ॥

मुनिगांव.

पौष व०२ शके १८४३.



संग्रह नं. ६२३ ९०।६।२०

## वाचकांस आशीर्वाद.

[वृत्त—शा. विक्रीडित.]

सारे जीव तसें अचेतन जगत् निर्माण केलें जयें ।
तारे अंबरिं हे अगाध करणी ज्याची दुजाला न ये ॥
केलें विश्व विशाल जो करितसे वैचित्र्य वस्तूंमधें ।
तो उत्पादक ब्रह्मदेव तुमचें कुर्यात् सदा मंगलम् ॥ १ ॥
जो भूमीवर योग्य वर्ष—समयीं वर्षाव पाडीतसे ।
धान्यें चोहिंकडे नितांत पिकवी पुष्पें फळें देतसे ॥
जो देई जगतास अन्न वसनें सौख्यांत ठेवीतसे ।
तो संरक्षक विष्णुदेव तुमचें कुर्यात् सदा मंगलम् ॥ २ ॥
जो योगी उघडा फकीर शरिरीं भस्मास चर्चीतसे ।
योग्यांना अनुकूळ जो सतत तत्कल्याण चिंतीतसे ॥
सर्पांचे विळखे गळां धरुनि जो ध्यानीं स्मशानीं बसे ।
तो संहारक शंभुदेव तुमचें कुर्यात् सदा मंगलम् ॥ ३ ॥
जेथें थोर ऋषी तपें करुनियां नीती-पथीं चालले ।
जेथें दिव्य पवित्र वेद अपुले त्यांच्या मुखें जन्मले ॥
धर्मात्मे बहु बुद्ध कृष्ण असले ज्याच्यावरी जाहले ।
तो हा देश महा पवित्र तुमचें कुर्यात् सदा मंगलम् ॥ ४ ॥

मुनिगांव.

फाल्गुन व० ३ शके १८४४

## कळकळीचे दोन शब्द!

[चाल—ला बाई ला]

तरुणांनो! । भावी देशाधारांनो ॥
वीरांनो! । आर्यदेवीच्या पुत्रांनो ॥ १ ॥
या पुढती । देशाची करवा बढती ॥
राष्ट्राला । या या उद्धारायाला ॥ २ ॥
स्वार्थाची । होळी वेळ करायाची ॥
वेळ शुची । यापुढती नच यायाची ॥ ३ ॥
संधी ही । भाग्यानें मिळली पाहीं ॥
प्रेमाची । ज्योत पेटुंदे हृदयाची ॥ ४ ॥
भेदाचा । खणाच खंदक खेदाचा ॥
ऐक्याचा । किल्ला बनवा देशाचा ॥ ५ ॥
परकीयां । दुस्तर होवो भेदाया ॥
ऐक्याचें । सामर्थ्य पहा मग तुमचें ॥ ६ ॥
देशाच्या । अभिमानाच्या घ्या बरच्या ॥
असिधार । ईर्षेची घ्या तलवार ॥ ७ ॥
माघार । घ्या न; न यायाची हार ॥
साचार । घालिल विजयश्री हार ॥ ८ ॥

मुंबई. पौष वद्य ४ शके १८४२

## प्रेमरूप परमात्म्यास.

[चाल—तयावनिं खेळे भूपसुता.]

मिळो तव प्रेमाचा घुटका ॥ धृ० ॥
तार मला, हृदयीं रमला दिसशी मजला लटका ॥ १ ॥
फार मला तव छंद भला नच भक्त असें तुटका ॥ २ ॥
वेड मला तव हे विमला मम हृदयिं तुझा चटका ॥ ३ ॥
प्रेममया करिं पूर्ण दया, उघडीं हृदया घटका ॥ ४ ॥

मालवण; कार्तिक व० ८ शके १८४१

---

## व्हावि कशी प्रगति?

[चाल—झातारी]

क्षणिक सुखासाठीं ।
तसा हा संपत्तीसाठीं ॥
मूढ जीव जगतीं ।
तळमळे; व्हावि कशी प्रगति? ॥ १ ॥
संसारासाठीं ।
तसा हा सन्मानासाठीं ॥
मूढ जीव जगतीं ।
तळमळे; व्हावि कशी प्रगति? ॥ २ ॥
गृहदारांसाठीं ।
तसा हा वतनधनासाठीं ॥
मूढ जीव जगतीं ।
तळमळे; व्हावि कशी प्रगति? ॥ ३ ॥

... ग्रंथ संग्रहालय ... नं. ... ता. ... ठाणे

चैनीच्यासाठीं ।
तसा हा पोषाकांसाठीं ॥
मूढ जीव जगतीं ।
तळमळे; व्हावि कशी प्रगति? ॥ ४ ॥
वस्तुविधासाठीं ।
तसा हा अशाश्वतासाठीं ॥
मूढ जीव जगतीं ।
तळमळे; व्हावि कशी प्रगति? ॥ ५ ॥
मुनिगांव; श्रावण शुद्ध २ शके १८४३.

## स्वहितकार.

[ वृत्त — स्वागता ]

जो सदां परपिडा नर जाणी ।
जो परास्तव सुखावर पाणी ॥
सोडि; धीर नच सोडिल जो कीं ।
तो करी स्वहित या नर लोकीं ॥ १ ॥
दावि जो सतत प्रेम जिवांशीं ।
ठेवि जो नर न लोभ धनाशीं ॥
बीट जो धरुनियां भव टाकी ।
तो करी स्वहित या नर लोकीं ॥ २ ॥
जो स्वदेशहितचिंतन ठेवी ।
जो स्वदेह परकारणिं लावी ॥
वर्तनीं सतत दूर बिलोकी ।

तो करी स्वहित या नर लोकीं ॥ ३ ॥
दूर जो सकल दुर्गुण कोटी ।
मानि जो कुजन-संगत खोटी ॥
भोग जो नर विषासम लेखी ।
तो करी स्वहित या नर लोकीं ॥ ४ ॥
त्याग जो न करण्या अनमानी ।
जो कधीं नच कुणा अवमानी ॥
प्रेम ठेवि नर जो परलोकीं ।
तो करी स्वहित या नर लोकीं ॥ ५ ॥
जो भुले न बघुनी बहिरंगा ।
चिंति जो सतत त्या बजरंगा ॥
भाव जो धरुनि देव विलोकी ।
तो करी स्वहित या नर लोकीं ॥ ६ ॥

मुनिगांव; आषाढ ब० ३० शके १८४३.

## वात्सल्य.

[वृत्त — सम-वियोगिनी]

‘ हंस बाळे ! रडतीस कां सुते? ।
नयनींचें चल पूस आंसु तें ’ ॥
प्रिय कन्येप्रत माय बोलली ।
नच उक्ती कवि-कल्पनेंतली ॥ १ ॥
मुलगी राजस गौर कोमला ।
सुशिला गोंडस बाळ निर्मला ॥
कर ते लाल कपोल देखणी ।
नुमटे वर्णन रम्य लेखनीं ॥ २ ॥
धरुनी दो कर ओढिली सुता ।
प्रिय माता कुरवाळि तोलतां ॥
मुख तें रम्य सुरम्य नेत्र ते ।
मुखचंद्राप्रत माय चुंबिते ॥ ३ ॥

मुनिगांव; ज्येष्ठ शुद्ध १० शके १८४३.

## हें योग्य आहे काय ?

[ चाल—दिंडी. ]

'योग्य आहे काय हें यापरीस ?' ।
प्रश्न करणें सर्वदा मानसास ॥
जईं कार्या लागशी सान मोठ्या ।
घेइं प्रश्नाच्या उत्तरा चखोट्या ॥ १ ॥
जसें उत्तर सदसद्विवेक देई ।
तसा कार्याला हस्त पुढें नेईं ॥
कार्य शरिराचें, मनाचें, मुखाचें ।
असो; सत्यानें वागणें सुखाचें ॥ २ ॥

मालवण.

कार्तिक व० ६ शके १८४०

## प्रबोधन.

[ वृत्त—भुजंगप्रयात. ]

उठा हो चला कीं उषःकाल झाला ।
शुचिर्भूत होऊनियां उद्यमाला ॥
उषा उद्यमें रक्त-आरक्त झाली ।
पळाली निशा चंद्रकांती निमाली ॥ १ ॥

सदा रेंगळे चंद्र आलस्य-भारें ।
उशीरां रुजू होय कामीं सदा रे ॥
श्रमा टाळिल्यानें क्षयग्रस्त झाला ।
शकेना क्रमूं पूर्ण आकाश-गोला ॥२ ॥

परी चंद्र तो सोडिना आळसाला ।
रवि ग्रासि त्यासी अमावासयेला ॥
भयें चांदण्या तांतडीनें दडाल्या ।
उषें रक्त-वस्त्रांतरीं लोपवील्या ॥ ३ ॥

उमाळ्यावरी सूर्य आरूढ झाला ।
द्विजीं स्वागता हर्ष-किल्लाट केला ॥
गिरीकंदरीं श्वापदें लुप्त झालीं ।
तवालस्य-निद्रा परी ना निघाली ! ॥ ४ ॥

क्षणीं झोंपिं जाईं, उठें सुप्रभातीं ।
त्यजीं दीर्घ-सूत्रा, चढे स्वप्रभा ती ॥
सुकाळीं जरी उद्यमा आदरीशी ।
धनारोग्य-ज्ञान त्रयीं मेळवीशी॥५॥

मालवण, भाद्रपद शु० १३ शके १८४३.

## आर्यभूमातेस-

[ वृत्त—शालिनी ]

वंदीं माते आर्यदेवी तुला मीं।
प्रीती ठेवीं आपला बाल हा मी ॥
सेवा होवो आपुली एकभावें।
यासाठीं तूं शक्ति सौजन्य द्यावें॥१॥
उत्साहाचा शब्द ये देशदेशीं।
वेदांची तूं माय कां म्लान होशी! ॥
पावित्र्याची खाण तूं आर्यमाता।
स्वातंत्र्याचा शोध सन्मार्ग आतां ॥५॥
देई सौख्यें पूर्वकाळीं जशीं कां।
प्रेमानंदें देत होतीस लोकां ॥
सर्वत्रांना सर्वदा वंद्य हो गे।
उत्साहानें ऊठ गे ऊठ वेगें !॥३॥

मालवण.

भाद्रपद व० ११ शके १८४२.

## चला उद्यमाला.

[ वृत्त—भुजंगप्रयात. ]

उदेली पहा ही प्रभात प्रफुल्ला ।
पहा सर्व अंधार दूरी पळाला ॥
बसे आळशी तो असे मूढ नीच
चला उद्यमाला असे वेळ हीच ॥ १ ॥
प्रभा-ज्ञान येतां दिशा शुद्ध झाल्या ।
जगीं उद्यमा जीवजंतू निघाला ॥
तरीही अजूनी तुम्ही झोंपलांच! ।
चला उद्यमाला असे वेळ हीच ॥ २ ॥
जरी उद्यमातें तुम्ही ना कराल ।
ढमाली जगीं जीव कैसा घराल ? ॥
तुम्ही वंद्य व्हाया जगाला खरेंच ।
चला उद्यमाला असे वेळ हीच ॥ ३ ॥
बसोनी जसे स्तंभ कैसे तराल? ।
म्हणूनी सदांची करा हालचाल ॥
सुवेळा अशी ना पुढें यायचीच
चला उद्यमाला असे वेळ हीच ॥ ४ ॥

मुनिगांव; माघ, शु० ७ शके. १८४३

## फोडित मी हा टाहो !

[ चाल—दिवे लावुनी. ]

ऊठ ऊठ तर ऊठ अतां सत्वर वीरा ऊठ !
आर्य-पुत्र तुज लाज न का? पौरुष प्रकटो नीट १
उत्साहाचे आजवरी पाट वाहले देशीं
आणिबाणिच्या समयाला दुबळाई कां ऐशी ? २
दाखव अपुल्या हृदयींचा उत्साह जनालागीं
पुढें येउनी पुरुषत्वें हिंदमाय कर जागी ३
निजलेल्यांच्या बोधाचें शिंग फुंक कानांत
द्वेषाची तरवार तुझी पडो अतां म्यानांत ४
खितपत पडणें दास्यांत सोड सोड हें लोकीं
रखडविती जीं इतरांला फोड फोड तीं डोकीं ५
होईं मोठा व्यापारी जगताच्या बाजारीं
नामवेगळा राहुं नको बैसुनियां घरदारीं ६
कष्टें पर्वत चढूनियां शिखरीं आरोहावें
अवघड कार्यें करूनियां उच्चपदा पावावें ७
निश्चय हृदयीं बाळगुनी निश्चल कर्तव्यीं हो
कार्य-दक्ष तुज करावया फोडित मी हा टाहो ! ८

मुनिगांव; आश्विन व० २ शके १८४४.

## खुला होईन काय ?

[ वृत्त—गझल ]

नको हा व्यर्थ बंदीवास ।
ईश्वरा दे तुझा सहवास ॥
खुला मी खोल आकाशीं ।
गुलामी बोल कां देशी ? ॥ १ ॥
करुनियां कैद ह्या कारा- ।
गृहीं देशी मला थारा ॥
कसें हें आवडे तूतें ?
करीं देवा ! खुला मातें ॥ २ ॥
नृपाला जे दगा देती ।
असे कैदी खुले होती ॥
तुझा कैदी निरपराधी ।
खुला होईल काय कधीं ? ॥ ४ ॥

मुनिगांव.

फाल्गुन शु० १ शके १८४३.

## विश्वाचा नकाशा.

[वृत्त—साकी]

पृथ्वीला दडपील अशा घेऊनि कागदाला मी
विश्वाचा काढिला नकाशा त्याबर सुंदर नामीं १
पहात बसलों आनंदानें काढुनि होतां त्यास
प्रचंड जळत्या पाहुनि हर्षें सूर्यांच्या गोलांस २
नाना परिचे सूर्य तयामधिं नाना नव नव गोल
सूर्यांच्या मालिका लागल्या; विश्व किती तें खोल ३
असंख्यात बुध-गोल शुक्र किति नानापरिचे पाहीं
विश्वाच्या विस्तीर्णत्वाची मना कल्पना येई ४
मही पाहिल्या नाना त्यांवर नानापरिचे लोक
नकाशांत दिसलें तें कैसें शद्वीं वर्णूं चोख ५
नाना निर्मळ शीतलहोते मंगळ चंद्र शनी ते
लकलकणारे नाना तारे असंख्यात ग्रह होते ६
नाना परिच्या जगतांमाजी गजबजलेले लोक
असंख्य रानें असंख्य राज्यें असंख्य राजे चोख ७
असंख्य भुवनें बघतां बघतां दिसली रविची माला
पहात गेलों एका मागुनि एका नव-ग्रहाला ८
औत्सुक्यानें पृथ्वी अपुली पहावया जों गेलों ९
"हर हर" ऐसें पुटपुटलों मी उदास हृदयीं झालों ९
टिंब एक दिधलेलें दिसलें भूमितलास्तव मीच
मनांत म्हटलें 'काय आमुची मही एवढी नीच?' १०

कसचा अमुचा देश तयामधिं कसचा अमुचा गांव ?
कसचें अमुचें वतन तयामधिं घरास कसचा वाव! ११
माझें माझें म्हणुनि आजवर श्रमलों ज्याच्यासाठीं
अस्तित्वच नच तयास विश्वीं कशास माझी ऐटी? १२
मोठे मोठे राजे परि हे क्षुद्र किती हृदयांत!
असंख्य जीवां मारुनि मिळविति चार गांव युद्धांत १३
क्षुद्र किती हे जीव जगींचे क्षुद्र वस्तुंच्यासाठीं
असंख्य घेउानि बाळि दुसऱ्यांचे मिळविति पोटासाठीं!
पाठीच्या भावांचे घेती पोटीं शिरुनी प्राण।
क्षुद्रासाठीं घरीं मांडिती खूनावरती खून १५
क्षुद्रत्वाची जाणिव देती ओरडती कवि-भाट
क्षुद्र जगाच्या क्षुद्रत्वाचा तरि न कसा ये वीट? १६

मुनिगांव; फाल्गुन, व० १४ शके. १८४३

## कसा होवो पण देश उद्धरावा.

[ चाल—दिंडी. ]

होय जो कीं उपयोग आपणाला।
करुनि घ्यावा परकीय जरी झाला॥
असो शत्रूचा गुण तो वरावा।
कसा होवो पण देश उद्धरावा! ॥ १ ॥
त्यजुनि मीपण संकटीं हात द्यावा।
देह अपुला परकारणीं पडावा॥
आचरावी निष्काम देशसेवा।
कसा होवो पण देश उद्धरावा ॥ २ ॥
वेदकालिन सद्धर्म नच त्यजावा।
धर्मतत्वीं व्यवहार गुंतवावा॥
धर्म-नीतीस्तव देहहि त्यजावा।
कसा होवो पण देश उद्धरावा ॥ ३ ॥
कुणी देशीच्या प्रसारा करावें।
कुणी संन्यास-व्रता आचरावें॥
कुणीं समरीं शत्रूस मार द्यावा!।
कसा होवो पण देश उद्धरावा ॥ ४ ॥
विदेशीचा संसर्ग तो त्यजावा।
कुणी धंदा स्वयमेव उभारावा॥
उद्यमाचा अभिमान बाळगावा।
कसा होवो पण देस उद्धरावा ॥ ५ ॥

मालवण, चैत्र शु० ३ शके १८४२

श्री ग्रंथ संग्रहालय नं. ...

## पाडवा-प्रतिज्ञा

[ वृत्त—वियोगिनी ]

अविवेक-विचार घोळिती ।
नर जे ते नरकांत लोळती ॥
वरुषीं पहिलाच दीस हा ।
करितीं उत्सव मौज ती पहा ॥ १ ॥
म्हणुनी जन पाडवा नवा— ।
दिन हा वा हृदयांत वागवा ॥
करुनी पण वर्तना पुढें ।
सुधरा, ह्या वरुषांत घ्या धडे ॥ २ ॥
म्हणुनी पण आज हा असे ।
करितों मी; लटका न होतसे ॥
वरिलें मरणावरी सदा ।
फकिरी वर्तन तुच्छ संपदा ॥ ३ ॥
शरिरीं जिव, जोंवरी जिणें ।
नच राहें तंव सत्पदाविणें ॥
वरिला पथ हा पसंत या ।
क्रमिती जो जगतांत संत या ॥ ४ ॥
त्यजिलें घरदार सर्वथा ।
नव योगी मिळणार पर्वता ॥
जिव मी जगतास वाहिला ।
पण हा निश्चित आज जाहला ॥ ५ ॥

फाल्गुण, माघ शु० १ शके १८४२.

## तुझें स्मरण.

[ वृत्त—पृथ्वी ]

महान-गुणधी जगीं अवतरोनियां पावशी
अतर्क्य गुणगौरवा; गुरु मला न कां पावशी ?
तुझ्यासमचि येउं दे सतत मन्मनाला धृती
तुझें स्मरण रामतीर्थ मज देउं दे सद्गती १
तुझें भजन होउंदे सतत आठवो सन्मती
तुझ्यासम सुधर्म-नीति-रत राहुंदे मन्मती
तुझें मत मना पटो सकल आटपो दुर्मती
तुझें स्मरण रामतीर्थ ! मज देउंदे सद्गती २
तुझ्यासम मना गमो सकल जीव ते देवहो
कृती पुनित ती तुझी सतत मानसा जागवो
सदा मजसि होउंदे जगतिं वर्ततां त्वत्स्मृती
तुझें स्मरण रामतीर्थ! मज देउंदे सद्गती ३
तुझ्या चरित-चिंतनीं मन सदा असो गुंगलें
जसें त्वदिय मानस स्थिर निजांतरीं रंगलें
तुझे सुगुण गावुनी मज मिळो जगीं उन्नती
तुझें स्मरण रामतीर्थ! मज देउंदे सद्गती ४

मुनिगांव.
आषाढ व० ८ शके १८४३.

## भिकारी.

[ चाल—अभंग ]

वेष पालटूनी भिक्षेलागीं येती ।
ते जाणा दुर्मती दुराचारी ॥ १ ॥
भगवें घालीती भस्म चर्चिताती ।
चिपळी जे घेती भोंदू सारे ॥ २ ॥
तार तुतुण्याची व्यर्थ वाजवीती ।
दारांत सांगती धर्म करा ॥ ३ ॥
रात्रीचे करीती चोरी मारामारी ।
दिवसा भिकारी साधे भोळे ॥ ४ ॥
ऐशा भिकाऱ्यांना रोज धर्म केले ।
अंध पंगू मेले झोपडींत ॥ ५ ॥
व्यर्थ पोशियेले भिकारी देशांत ।
दुष्काळाला हात- भार लागे ॥ ६ ॥
करूं नये अशां उभे दारावरी ।
येणेंच श्रीहरी संतोषित ॥ ७ ॥

मुनिगांव; श्रावण, व० १४ शके १८४३

## राणीचा बाग.

[चाल:—आनंदी आनंद]

गेलों सहल कराया मी ।
भू हिरवी सगळी नामी ॥
काव्याचें तें माहेर ।
राणी--बाग मजेदार ॥ १ ॥
ठायींठायीं देखावे ।
रम्य मनोहर मन मोहे ॥
पाक्षि असे कीं गुलजार ।
राणी--बाग मजेदार ॥ २ ॥
क्रीडति बदकें पाण्यांत ।
विकसित कमलें त्याच्यांत ॥
तारा—गृह जाळीदार ।
राणी-बाग मजेदार ॥ ३ ॥
कुंज लतांचे लवलाहीं ।
हर्ष मनालागीं होई ॥
पंख फुलवितो ते मोर ।
राणी--बाग मजेदार ॥ ४ ॥
शीतळ छाया कुंजांत ।
लटकत वेली पवनांत ॥
चोहिंकडे हबकीं फार ।
राणी-बाग मजेदार ॥ ५ ॥

प्राणी अगणित गमतीचे ।
रंगांचे विविधाकृतिंचे ॥
दिसति किती शोभादार !
राणी--बाग मजेदार ॥ ६ ॥
सिंह घोरती निर्द्रित ।
चेष्टा माकड करितात ॥
करिती थट्टा लाचार ।
राणी--बाग मजेदार ॥ ७ ॥
दंग कितीजण बघण्यांत ।
बोट मुखीं आश्चर्यांत ॥
कोण सोडुनी जाणार ? ।
राणी--बाग मजेदार ॥ ८ ॥

मुनिगांव.

आश्विन शु० ११ शके १८४६.

## तारक तलवार.

[ चाल—नृत्यमतां० ]

तलवार जीव कीं प्राण
आह्मांस हिंदवासीयां ॥
धीर ती मनाला जाण ।
संकटीं करामधिं घ्याया ॥ १ ॥
करविते कृत्य शौर्याचें ।
थोरता स्वदेशा येई ॥
दिवसांत उलाढालींचे ।
तलवारिविण कसें होई ? ॥ २ ॥
शिवबाला. मोंगल भ्याले ।
तलवारचि कारण होई ॥
तलवार घेउनी लढले ।
स्थापिली मराठेशाही ॥ ३ ॥
परकीय वारण्या धाड ।
तलवार एकची देव ॥
बांडगूळ पर--सत्तेचें ।
तोडिती तियेचे घाव ॥ ४ ॥
तलवार तया शिवबाची ।
भगवती भवानी देवी ॥
काळजी निरसि देशाची ।
ती सकलीं अभिनंदावी ॥ ५ ॥
तारिलें तिनें देशाला ।

देश-दैन्य हरुनी नेवो ॥
मारिलें यवन--लोकांला ।
आज ती संकटीं पावो ॥ ६ ॥
सत्ता न तिच्यावांचोनी ।
हातांत कुणाच्या आली ॥
हें नमन तिला करिं ह्मणुनी ।
तलवार संकटीं वाली ॥ ७ ॥

मुंबई.
मार्गशीर्ष शु० ६ शके १८४२

## कोण कोणाचे नाहींत.

[चाल— सांवळ्या गोविंदू गोविंदू]

कोण कोणाचे कोणाचे जगतीं नाहीं साचे ॥ धृ० ॥
बहीण भाऊ येति न कामीं आप्त सर्व दमडीचे ॥ १ ॥
अंथरुणावरि दुर्बळ पडतां मित्र न भेटति त्यांचे ॥ २ ॥
लांबुनि ह्मणती पसरिल मेला रोग हि आप्त तयांचे ॥ ३ ॥
प्रसंग पडतां कामा येति न मामा अथवा भाचे ॥ ४ ॥
शब्दें पुसति न दुस्तर समया कोणहि जीव जिवाचे ॥ ५ ॥

मालवण; अधिक--श्रावण शु० ५ शके १८४२

## घे गांधींचा बोध

[ चालः—सुखकर साधूसंग]

घे गांधीचा बोध ॥ हितकर० ॥ धृ० ॥
क्षण-भंगुर तनु जाणुनि अपुल्या ।
स्वातंत्र्याला शोध ॥ हितकर० ॥ १ ॥
देशासाठीं अर्पुनि जीवित ।
सोड जातिंचा भेद ॥ हितकर० ॥ २ ॥
वस्त्र-भूषणें जाडीं देशी ।
घालुनि पाव प्रमोद ॥ हितकर० ॥ ३ ॥
सोन्याची ही संधी जातां ।
पावशि नंतर खेद ॥ हितकर० ॥ ४ ॥

मुनिगांव; आश्विन व० ३० शके १८३४.

## आजकाल.

[वृत्त—अनुष्टुप]

जागें आतां तरी व्हावें । देशाच्या कारणास्तव ॥
जातींचा द्वेष यासाठीं । देशाला दास्य हें तव ॥ १ ॥
सत्ता हातामध्यें येतां । अन्य जातींस दाबिती ॥
मौर्ख्य हेंच समस्तांचें । आपुला घात योजिती ॥ २ ॥
मोठे झाले स्वयें जे जे । अन्यांला ताप देउनी ॥
तयांचीं दुष्ट कर्में तीं । जाचती त्यांजलागुनी ॥ ३ ॥
श्रेष्ठांस ठेंचुनी पायीं । श्रेष्ठ बोलून घेतलें ॥
ऐशांचीं आजच्या काळीं । दुर्दशा पावती मुलें ॥ ४ ॥

मुनिगांव; पौष, व० ९ शके १८४४.

श्री ग्रंथ संग्रहालय नं. ...

## भ्याला तो मेला!

[ चाल—नृपममता० ]

सिंह वाघ हे भयभीत ।
मानवासही होतात ॥
पण मानव धैर्यें जेव्हां ।
अंगावर जाइल तेव्हां ॥ १ ॥
संकटांस देऊनि तोंड ।
घालि जो तयांवर धोंड ॥
काळाशीं झुंजत गेला ।
गाजतो तयाचा टोला ॥ २ ॥
जो उत्साहाचा वीर ।
जो धीरवंत खंबीर ॥
तो मारुनि लाथा धरणीं ।
दगडांतुनि काढिल पाणी ॥ ३ ॥
जो धैर्यें पुढती आला ।
तो जगांत विजयी झाला ॥
जो शूर न सोडी धीर ।
बांधि तो कीर्ति--मंदीर ॥ ४ ॥
जो जगांत भीतच गेला ।
तो जिवंत असुनी मेला ॥
भीती ही दुबळी लोकीं ।
धैर्य तेंच काढी डोकी ॥ ५ ॥

भीतीचा लंगडा पाय ।
धैर्य हाच शूर शिपाय ॥
भीतीनें थोरहि मेले ।
धैर्य नांव करुनी गेलें ॥ ६ ॥

मुनिगांव; आश्विन शु. ११ शके १८४३

—( * )—

## हृदयाचा निर्धार.

[चाल— नृपममता.]

जें मुळींच नाहीं म्हटलें ।
तें होइल आतां कुठलें ? ॥
जो फकिर एकदां झाला ।
तो संसारीं न उतरला ॥ १ ॥
मीं स्वतंत्र ज्यानें म्हटलें ।
त्या पारतंत्र्य मग कुठलें? ॥
जो हरपल्याचिया मागें ।
त्या कोण परतवूं जागे? ॥ २ ॥
निर्धार करी जाहीर ।
हा असा शूर शाहीर ॥
उमटला पहा अंतींचा ।
हा ठसा आत्म-हृदयाचा ॥ ३ ॥

मुनिगांव.

आश्विन व. ३० शके १८४३.

## देवाचें वसतिस्थान

[चालः—अभंग]

नको गंगा नको काशी। देव आहे तुझ्या पाशीं॥
देव नाहीं देऊळांत। राहे तुझ्या हृदयांत॥१॥
ज्याचें मन घेई ओढे। त्यास देव दृष्टी पडे॥
नाहिं पवित्र क्षेत्रांत। देव संचरे जगांत॥२॥
देवा नको धूप दीप। एक मनाचा संकल्प॥
देव मिळतो मनानें। त्यास नको तीर्थ-स्नानें॥३॥
देवा भक्तीची आवडी। नाहिं नैवेद्याची गोडी॥
देवा भावनेची भूल। नको गुलाबाचें फूल॥४॥
वास पवित्र मनाचा। नको अगरबत्तीचा॥
पुण्य मानस निर्मळ। हेंचि देवाचें देऊळ!॥२॥

मुनिगांव, आश्विन व १० शके १८४३

## विलक्षण स्वप्न.

[ वृत्त—स्वागता ]

स्वप्न एक पडलें गमतीचें ।
चित्र त्यांत उठलें स्वमतीचें ॥
शेत एक अति विस्तृत होतें ।
पक्व त्यांत कणसें आणि भातें ॥ १ ॥
माकडें बहुत त्यांत भगेनीं।
सोडिती सकल फस्त करोनी ॥
मीं झटें खटपटें फिरवाया ॥
ते मला चुकविती परि खाया ॥ २ ॥
या दिशेस वळतां तिकडोनी ।
त्या दिशेस वळतां इकडोनी ॥
खाउनी सकल शेत बुडालें ।
यत्न सर्व विलया मम गेले ॥ ३ ॥
झोंप सर्व मम मावळली तों ।
सत्य-शोध मजला मग होतो ॥
शेत तें नसुनि भू अमुची ते ।
माकडें नसुनि+++होते ॥ ४ ॥

सुनिगांव; कार्तिक व०३० शके १८४३.

## असे हें मागणें.

[ चाल—गझल ]

परांच्या थोरतेसाठीं ।
न केव्हां होउंदे हेवा ॥
तयांसम थोर व्हायाची ।
सुबुद्धी दे मला देवा ॥ १ ॥
कठिण समयीं अचल शांती ।
सदा माझ्या हृदीं ठेवा ॥
सदांचा देह हा माझा ।
परांच्या कारणीं लावा ॥ २ ॥
कदाही लोभ द्रव्याचा ।
न माझ्या मानसा व्हावा ॥
सुखाची लालसा माझ्या ।
न केव्हांही मनीं ठेवा ॥ ३ ॥
सदाचारें दुज्यां लोकीं ।
सदा सन्मार्ग दावावा ॥
असें हें मागणें इतुकें ।
तुझ्यापाशीं मला देवा ॥ ४ ॥

मुनिगांव; कार्तिक शु. १३ शके १८४४

## झकापकी!

[चाल—दिवे लावुनी.]

उसनीं वैभव-ऐट शिरे घरांत तुमच्या जी कीं।
पाहुनि हर्षित होइं असा मीं न, मूर्ख जन लोकीं १
कपडे सुंदर करीतसां, कुत्राही न विचारी।
जाणवीतसां मात्र असें कीं आपण अविचारी २
सजतां नटसे छाकट कीं ऐट करुनियां खाशी
माहित मजला घर तुमचें गहाण श्रीमंतांशीं ३
अविचाराची झकापकी करुनि ह्मणवितां थोर
जाणें घरची लकालकी मी नच केवळ पोर! ४
अंगावर भर जर गोरे हृदय आंतुनी काळें
केवळ देहीं घमन्या हीं अज्ञानाचीं पाळें ५
पाहुनि वैभव दिपायचा इतुका नच अनभिज्ञ।
साधी खादी वापरिती तेच समंजस सूज्ञ ६

मुनिगांव.
कार्तिक व. ११ शके १८४४.

## हिंद उद्धराया.

[ चाल :— दिंडी ]

भीत मागें राहिलां फार लोकीं ।
स्मरा नाम पुन्हा आर्यपुत्र व्हा कीं ॥
एकचित्तानें कर्म आचरूंया ।
चला जाऊंया हिंद उद्धराया ॥ १ ॥
व्यर्थ तोंडें वेंगाडितां परांशीं ।
परी फिटति न कधिं जन्म-तापराशी ॥
नसे उरलें देशांत अन्न खाया ।
चला जाऊंया हिंद उद्धराया ॥२॥
तुम्हीं होतां जगतांत थोर मागें ।
इतर गेले टाकूनि देश मागें ॥
देश अपुला लुटियला जात वायां ।
चला जाऊंया हिंद उद्धराया ॥३॥
आत्म-सामर्थ्यें जगत् जिंकुनीयां ।
सर्व जबरी-जुलुमास झुगारूंया ॥
स्वराज्याच्या सौख्यास अनुभवूंया ।
चला जाऊंया हिंद उद्धराया ॥४॥

मालवण, मार्गशीर्ष शु १४ शके १८४१

## वृथाचि जीवित!

[वृत्त—उपजाति]

येत्या प्रसंगाप्रति तोंड देना ।
उत्साह सोडून करी तनाना ॥
राहे सदा चित्त विषण्ण ज्याचें ।
वृथाचि त्या जीवित मानवाचें ॥ १ ॥
उद्योग धंदे सगळेच टाकी ।
फिरे पथांतून करून झाकी ॥
चित्त स्थिरावे व्यसनीं जयाचें ।
वृथाची त्या जीवित मानवाचें ॥ २ ॥
चालोनि येतां गुरु बोध घेना ।
स्वहीत-भाषा हि परीसेवना ॥
विचार चित्तीं दुबळे जयाचे ।
वृथाचि त्या जीवित मानवाचें ॥ ३ ॥
जाया सुमार्गीं जन नाजवी जो ।
दुर्मार्ग-वर्ती जन बोधिना जो ॥
महत्व ना ज्या स्वसुधारणेचें ।
वृथाचि त्या जीवित मानवाचें ॥ ४ ॥

मुनिगांव;        भाद्रपद शु० ३० शके १८४३.

## विशिष्टता

[ चाल :— नृपममता ]

त्यांचेच तयांला ऐसे ।
 गुण विशिष्ट प्राणीयांचे ॥
जरि साध्य प्रयत्नें कांहीं ।
 तरि विशिष्टता ही राही ॥ १ ॥
जेविं दूध सिंहीणिचें ।
 पात्रांत हिरण्मय राही ॥
ठेवितां इतर धातूच्या ।
 भांड्यांत फुटुनि तें जाई ॥ २ ॥
काजरा विषारी फार ।
 नर खातां होतो ठार ॥
वामकरें वानर खाई ।
 विष त्याला बाधत नाहीं ॥ ३ ॥

मुनिगांव.

मार्गशीर्ष शु. १० शके १८४४

## करुणास्पद स्थिती

[ अभंग ]

सांजसकाळ राबतां । कांदाभाकरीची चिंता ॥
घरिं ढेकूण पीसवा । करितात सदा सेवा १
नाहिं पैसा लोकांपाशीं । जन उघडे सर्वांशी ॥
लाखों गरीबां लोकांला । नाहिं अन्न खावयाला २
कोणि उपास काढीती । कोणि पालेभाजी खाती ॥
नाहीं नेसायाला कांहीं । दिसे उघडें अंगही ३
नाहिं डोकीला पगडी । काया सदाची उघडी ॥
मारमारोनियां पटी । उभा लाविली लंगोटी ४
चोळ्यां लुगड्यां सगळीं । ठिगळें लालट जांभळीं ॥
हिंगा मिठाला दुष्काळ । कळण्या कोंड्याची चंगळ ५
तांबे मातीचे घरांत । रात्रिं नाहीं तेलवात ॥
चुलीचिया रस्सोंड्याशीं । जेवि बाप आणि काशी ६
शेतावर जाई 'फटा'। खांदीं कांबळ्याचा लटा ॥
पांघराया गोण ओला । थंडीमुळें आंखडला ७
घरावरती सांपळे ! आंत उंदीरांचीं बीळें ॥
बायकांचे अलंकार । कथिल शोभे अंगावर ८
ऐशी गरीबांची स्थिती । डोळ्यांतूनी दुःखें येती ॥
कसे सहावे यावर । लादिलेले नाना कर ९

मुनिगांव; आश्विन व.४ शके १८४३

## धर्म-वेड!

[ चाल :— दिवे लावुनी ]

लोकीं तासुनि विधवांना विद्रुप जे करितात ।
ऐशा अजाण मूर्खांची बरवी का ही रीत ॥ १ ॥
बारा वर्षांची पोरी म्हातारे वरितात ।
ऐशा परिनें विधवांची उत्पत्ती करितात ॥ २ ॥
छाया पडतां शूद्राची करिती जाउनि स्नान ।
मांस कसें मग भक्षिति ते सोवळ्यास नेसून? ॥ ३ ॥
ह्मणती आपण धर्माचे कांदे केवळ खाण ।
मग कां कापुनि बकऱ्यांच्या माना घेती प्राण ॥४॥
दगडांच्या देवासाठीं बळी माणसें देती ।
दगडांहुनि तीं श्रेष्ठ न कां? पातक करितां हातीं॥५॥
देवाच्या नांवावर जे भरिति आपुलें पोट ।
जिवंत असतां जन ते ते नरका जाती थेट ॥ ६ ॥
तोंडावर साधुत्वाच्या बाता देती छान ।
भावाचा मग कां करिती वतनासाठीं खून? ॥ ७ ॥
अह्मीं सोवळे शास्त्रज्ञ अभिमान असा धरिती ।
श्राद्ध-तर्पणाच्या वेळीं कां मग पाढे ह्मणती ?॥ ८ ॥
स्नान करुनियां पुटपुटती गळां घालिती माळ ।
भोजन समयीं कां देती आचाऱ्याला गाळ ? ॥ ९ ॥
धर्माच्या नांवाखालीं अधर्म होतो फार ।
सूज्ञ असे ते करा जरा सारासार विचार ! ॥ १० ॥

— मुनिगांव, मार्गशीर्ष शु. ३ शके १८४४

## नच गवसे !

[चाल—आनंदी आनंद]

हिरव्या मैदांनीं एक ।
मुलगी फिरते निःशंक ॥
फूलपाखरूं अन्य असे ।
तें मुलगीला नच गवसे ! ॥ १॥
ती त्या मैदानावरुनी ।
इकडे तिकडे फिरफिरुनी ॥
दुडदुड मागुनि धावतसे ।
तें मुलगीला नच गवसे ! ॥ २ ॥
सुंदर छान परी सान ।
दीड दोन वर्षांची न ॥
हळूच मागुनि जात असे ।
तें मुलगीला नच गवसे ! ॥ ३ ॥
गोंडस गौर अशी पुतळी ।
सान परि न साधी भोळी ॥
पकडूं त्या ती झटत असे ।
तें मुलगीला नच गवसे! ॥ ४ ॥
छान सानशीं रम्य फुलें ।
तोडित, फुलपक्ष्यास भुले ॥
चों बाजूंला हिंडतसे ।
तें मुलगीला नच गवसे! ॥ ५ ॥

आठव नव्हती खाण्याची ।
अथवा अन्नापाण्याची ॥
इकडुनि तिकडे उडुनि बसे ।
तें मुलगीला नच गवसे! ॥ ६ ॥
चट तिजला स्वातंत्र्याची ।
आवडही वन-सुमनांची ॥
खेळगडी तिज तेंच असे ।
तें मुलगीला नच गवसे! ॥ ७ ॥

सुनिगांव; आश्विन व.१० शके १८४३

ग्रंथ संग्रहालय नं. ...

## संसार-रतांस

[ अभंग ]

तुम्ही सर्व जातां साउलीच्या मागें ।
पहा अंतरंगीं आत्महित ॥ १ ॥
स्वार्थ सोडोनीयां परमार्थ धरा ।
सुखें येती घरा चालोनियां ॥ २ ॥
खपा सर्व-काळ परहितासाठीं ।
बांधावा तो गांठीं पुण्य-ठेवा ॥ ३ ॥
धरा काहीं लाज, टाका सर्व साज ।
अविरत काज काम करा ॥ ४ ॥
तुम्ही घरीं-दारीं तंटे मांडियेले ।
तेणें काय झालें हित बोला? ॥ ५ ॥
पुत्र मारी बापा भाव मारी भावा ।
हेतू कीं मिळावा द्रव्य-ठेवा ॥ ६ ॥
एका एका घरीं सतरा चिन्हाडें ।
जपे जीवापाडें संसारासी ॥ ७ ॥
एकाची ते दृष्टी दुजासी खपेना ।
मनीं करी नाना दुष्ट बेत ॥ ८ ॥
मिळवाया एक जमिनीचा कोन ।
घरीं करी खून आपुलिया ॥ ९ ॥
काय तीं सदनें तुम्हांसवें येती? ।
मातीमधें माती मिळों जाय ॥ १० ॥

कर्जे कफावती करोनी नाडलां ।
तरी न मनाला वीट येई ॥११॥
घरींच्या बेकीनें घरें लया जाती ।
तया जागीं होती घरटणें ॥ १५॥
उदास संसारीं असावें सदाची ।
उत्साहतीर्थांची वाणी ह्मणे ॥ १३॥

मुनिगांव.
श्रावण व. १२ शके १८४३.

## अहिंसा-धर्म.

[ अभंग ]

बुडो तव मन भूतदया-डोहीं ।
कृपावंत होईं प्राणीयांसी ॥ १ ॥
वागवावें भूतां भागवीं न त्यांतें ।
विनवणी तूतें मानवा रे ॥ २ ॥
पीडा नको देऊं त्या जनावरांसी ।
नको पाप-राशि जोडूं नांवा ॥ ३ ॥
झाडपाला खाती आणि जला पिती ।
कां तयांला भीती व्यर्थ देतां ॥ ४ ॥
छान चिमुकले द्विज रंजविती ।
तोषविती गाती सकाळींच ॥ ५ ॥
तयां मारावया हात तुम्हां येती ।
जळो ऐशी छाती निष्ठूरांचीं ॥ ६ ॥
हिंसा नको करूं जीवां नको मारूं ।
त्याहुनि स्वीकारीं आत्महत्या ॥ ७ ॥
इच्छितोसि जर करूं आत्मोद्धार ।
हिंसेविण कर आहारासी ॥ ८ ॥
देवें निर्मियेला प्राणिमात्र भला ।
नसे तो तुजला खावयासी ॥ ९ ॥
त्याचा आहे हेतू गूढ बा याच्यांत ।
नको करूं घात प्राणीयांचा ॥ १० ॥

मालवण; मार्गशीर्ष व ७शके १८४०

## सम्राट-संन्यासी.

[ वृत्त—मंदारमाला- ]

आधार मीं या जगाचा असें, एक काडी न हालेचि यावांचुनी
चाले मदीयांतरीं सर्व व्यापार, नेई जगा मीं सुखाच्या वनीं
माझ्यापुढें कोण शक्ती न चाले, जगीं या धुडावूं शके ना मला
राहें सदा व्यापुनी विश्व माझ्याहुनी ना जगीं कोणही शोभला १
प्यादे तसे सर्व राजे मला, या जगाच्या मधें शोभलों भूप मीं
वेडा कुणी बोलती, कोण साधू मला बोलती, फार पर्वा कमी
राहें सदा वीर-वृत्ती धरोनी भरीं माझिया दिव्य प्रेमें मला
झालों सुरां देव नाहीं उरे भाव देवांमधें ठाव मीं घेतला २
दुःखें न येती मला केधवां, ती न चिंता मला एक आहे पिसें
नाहीं मला धाक नाहीं मला शोक माझा मला स्वर्ग चित्तीं दिसे
गेलीं तटाटां तुटोनीच तीं सर्वही बंधनें मोकळा मीं जगीं
नाहीं मला पाश नाहीं मला आस नाहीं मला नाश नाहीं बघी! ३
सत्ता जगीं सर्व माझी च आहे रवी चालला तोहि माझ्यामुळें
ती सूर्यमाला तसा चंद्र सारे नभीं जाति मार्गात माझ्या बळें
तारे हिरे ज्यापरी कोंदणीं ठेवियेले रचोनी स्वतां मीं नभीं
सारे गिरी उंच तैशा दऱ्या त्या नद्याही बळें निर्मिलें सर्व मीं ४
टांगीं शशी रम्य माझा दिवा वाचितों सृष्टिचीं पुस्तकें गूढ तीं
वायू असे मित्र माझा सदां त्यापरी चालतां श्वापदें भोंवतीं
रानीं वनीं स्वैर संचार माझा जगीं जीव मीं निर्मिले गोजिरे
सर्वां मुखीं बोलतों मीं तयां चालतीं मीं तयांच्या हृदीं संचरें ५

ग्रा. क्र. २३६८

आनंदि आनंद माझ्या हृदीं बैसला ठाव देवोवियां हांसतों
केलें असे रम्य हें विश्व मीं वायु व्योमादि यांच्यामध नाचतों
पक्ष्यांवीरा प्रेम वृक्षांतळीं धाम माझें नसे काम लोकांरुधीं
स्वातंत्र्य गोडी मला हीच बेडी असो सर्वदा हीच हातीं पदीं ६
ओढी सतजाकडे वा प्रमोदाकडे आपुली सर्वदा सांगतों
झाडीं जिथें गच्च गोडी मला तेथ माझा असे वस्तिचा ठाव तो
मीं हांसवीं बालकांना तसे नाचवीं सर्व ओढे वनींच्या वनीं
गुं गुं करोनी सदा धांवतों वेडपा रम्य पुष्पांचिया मागुनी ७
मृत्यूमधें त्या न सामर्थ्य न्याया मला ओढुनीयां जगा सोडुनी
काया स्वतां टाकुनीयां खुशालींत राहेन विश्वांत मीं व्यापुनी
वाऱ्याचिया वेग-धारांत राहीन वाराच खाईन पोटास मीं
माया मला सोडुनीयां पळाली जगांतून मीं तीस केलें कमी ८
सर्वत्र साम्राज्य माझें अधीराज्य नाहीं मला त्याज्य तें केधवां
आकाश तें साक्ष देईल माझी कसाही मला कोणही वागवा
मीं ठेविला ना विसावा हवेला सदा हालवीं मंदिरीं गव्हरीं
ज्या पेटवीं आत्म-यज्ञास तेणें सकाळींच आकाश शोभा धरी ९
अभ्यंतरीं धुंद मीं सच्चिदानंद साचा मला छंद त्याचा असे
नाहीं असें कोणतें तत्व अज्ञात ह्या सर्व विश्वांत मातें दिसे
संदेह खंती पळाली मनींची जळाली मुनीची तशी सर्व भ्रां
सौंदर्य शोकी वनींचें विलोकीत,नाहीं मला कांहिं लोकीं कमी १०
नाहीं मला कोणताही रिपू आडकाठी मला कोणही ना करी
स्वातंत्र्य भोगी सदा ज्ञानयोगी जगीं या नसे कोणती चाकरी

विद्याच आधार वाणी अलंकार मातें जगीं स्वैर संचार दे
स्वातंत्र्य स्वायत्त आनंदि मच्चित्त ठावा असें मीं तुला शारदे ११

मालवण; चैत्र शुद्ध १३शके १८४१.

## कवींस विनंति.

[ चाल—उद्धवाशांतवन ]

हा साष्टांग नमस्कार ।
मम कवी-जनांस त्रिवार ॥
विनवितों तुह्मांला कांकीं ।
खाजवीत बसतां डोकीं ॥ १ ॥
गातां परि नाहीं भान ।
कवितेवर रुजलें रान ॥
पोर-गीत बाष्कळ गाणीं ।
गाण्यात वेंचतां वाणी ॥ २ ॥
गात जा उदात्त विचार ।
मौर्ख्य तें करा सब दूर ॥
स्फूर्तीचे शब्द असावे ।
कर्तव्यीं दक्ष करावें ॥
जाण्यास सकल कुविचार ।
द्या शब्द-शरांचा मार ॥
पाठ पारमार्थिक द्यावे ।
यश पूर्वींच्यांचें गावें ॥ ४ ॥

जें ऐकुनि सोडुनि देती ।
जन जगतांतील अनीती ॥
किति हृदयीं भरली पूर्ण ।
कटु-संस्कारांची घाण ! ॥ ५ ॥
जाइल ती सर्व निघून ।
जोर असा शद्बीं आण ॥
जोडोनी दोहिं करांला ।
विज्ञप्ती हीच तुह्मांला ॥ ६ ॥

मुनिगांव; माघ शु० ११ शके १८४४.

## तुझी सत्ता!

[ वृत्त—इंद्रवज्रा. ]

हे ईश्वरा मीं पुसतों तुला कीं ।
सांगें मला सत्य मुळीं न झांकीं ॥
साम्राज्य हें कोठवरी पसारे ? ।
त्याच्या सिमा होतिल दृश्य का रे ? ॥ १ ॥
सीमा तयाच्या असतील कोठें ? ।
केल्या कशाच्या मज गूढ मोठें ! ॥
आकाश वायू जल ताप तारे ।
खोरीं महा उंच गिरी पठारें ॥ २ ॥
पक्षी पशू भिन्न हि देशदेशीं ।
रीती कृती भिन्न जगांत तैशी ॥

एकाहुनी भिन्न जगांत एक ।
रूपें कशीं हीं करिसी अनेक? ॥ ६ ॥
लीला अगाधा तव विश्व दावी ।
गुह्यें मला सर्व विदीत व्हावीं ॥
ईशा कसे जीव जगांत केले?।
निर्माण का हे स्वयमेव झाले? ॥ ४ ॥
कोणी असे राज-सुखांत दंग ।
कोणी भिकारी वद कां भणंग? ॥
हें तेज अंधार अपार सारें ।
चौऱ्यायशींचेच अगम्य फेरे! ॥ ५ ॥
गुंफोनि सारें जग-सूत्रधारा ।
कोठें करीसी नकळे वसारा ॥
संदेह दुःखें भय यातना हे ।
व्याधी तसे रोग हजार आहे ॥ ६ ॥
मृत्यू तसा आ पसरोनि राहे ।
सारें जगत् भक्ष्य तयास आहे ॥
कार्यें तुझीं ना कळतीच नीट ।
सत्ता तुझी सर्व असे अफाट! ॥ ७ ॥

मालवण; माघ शु० २ शके १८४०

## माझा पुढील मार्ग.

[ दिंडी ]

आजपासुनि वागेन जसा योगी ।
तृप्त चित्तीं आनंद सदा भोगीं ।।
काय मातें कर्तव्य या जगाशीं ? ।
कुणी निंदो नच लाज मन्मनासी ।। १ ।।
काय मातें बोलोनि उणा नेती ? ।
बोलण्याची जगतांत असे रीति ।।
काय लोक मला उद्धरण्या येती ? ।
काय मातें ते ब्रह्मपदीं नेती ? ।। २ ।।
कसा सुखवूं मीं एक सर्व लोकां ? ।
लाज माझी सर्वात्मकास एका ।।
चित्त माझें ना राहणार गेहीं ।
न तें अथवा राहेल छान देहीं ।। ३ ।।
उदासीन जसा सतत शुद्ध योगी ।
तसा राहें मीं वस्तुविध न भोगीं ।।
घरें सुंदर सौंदर्य नको मातें ।
मदिय हृदयींचें श्रेय ओढ घेतें ।। ४ ।।
प्रेम हृदयीं माझिया विश्व-व्यापी ।
मीं न कोणातें अहित शब्दिं शापीं ।।
सदा निर्भय चित्तांत राहतों कीं ।
शक्त शक्ति न भिववावयास लोकीं ।। ५ ।।

अहंभावाचा कोट दूर केला ।
मदिय चित्तांतुनि रागरोष गेला ॥
नसे भीती कवणास कदा माझी ।
समस्तांवर सर्वदा असें राजी ॥ ६ ॥
निघुनि गेला मम मीपणा समूळ ।
असे आतां हृदयांत एक मूळ ॥
नसे मी तूं ही भावना मनातें ।
नसे निंदा ना खेद कामना ते ॥ ७ ॥
नसे संसारीं आत्मता मदीय ।
नसे मोह मना त्यागिले स्वकीय ॥
देह-भीतीचा पूर्ण नाश केला ।
पुढिल संन्यासी प्रकट आज झाला ! ॥ ८ ॥

मालवण; पौष शु० १० शके १८४१

## ऊठ भारता!

[ चाल—फटका. ]

ऊठ भारता! ऊठ झडकरी कर्तव्याची कास धरीं ।
पुन्हां एकदां पूर्वकाळच्या चढ चढ वैभव नगावरी १
लोळत पडणें पुरे अतां हें दुर्बलतेला दूर करी ।
अज्ञानाच्या अंधाराची निशा पळाली दूरवरी २
उत्साहाचें उद्दंड वारें तुझ्या खेळुं दे अंगांत ।
नको पडूं बेहोष होउनी चैन मजेच्या रंगांत ३
सध्यांचे हे कळी कुरापत न्याय कायदे नको घरीं ।
पूर्वकाळचे तसे हिरणमय कळस चमकुंद घरांवरी ४
ऊठ भारता ! स्थिती तुझी बघ हीन दीन दुबळी झाली ।
म्हणविसि जे जन दालि तुझे ते तुडविति तुज पायांखालीं ५
प्लेग तसा दुष्काळ मातला धान्य चाललें परदेशा ।
स्वार्थापायीं सर्व बुडालें दुर्मार्गाची दिसे दिशा ६
परकीयांचे हस्तक जे ते करिति न पर्वा कोणाची ।
आपसांतले पक्ष मोडुनी रक्ष थोरवी देशाची ७
सद्धर्मानें स्वतां चालतां वैरी पळती दूरवरी ।
मागुनि जगतीं कांहिं न मिळतें मिळवायाला यत्न करीं ८
सुधारणा कर अपुली आधीं धू हृदयाचें गाभारें ।
आत्मोन्नातिला अपाय करिता दोष काढुनी टाक त्वरें ९
हृदयामाजी उदया येवो दया-देवता दिव्य भली ।
विषय दुष्टवासना दुराग्रह दे दे यांना तिलांजली १०

भीड भाड ती सोडुनि मुर्वत मार्ग आपुला क्रमण करीं ।
तरिच भारता विविध जगीं या विजयी होसी खरोखरी ११
जात पंथ हा भेद सोडुनी परनिंदेला दूर करीं ।
शत्रु तुझे परि मित्र मान ते दुष्ट जनांची कींव करीं १२
कर्म वर्म विसरुनि सारीं समता चिंतीं जगावरी ।
वरचढ त्यांचा द्वेष टाकुनी कर थोरांची बरोबरी १३
'माझ्या हातीं काय व्हायचें ?' कशास दुबळे प्रश्न असे ? ।
खरी जिवाची कळकळ असतां असाध्य जगतीं काय असे ? १४
आत्म-हिताची जाणिव कैशी तुला न होते आजवरी?
ऊठ भारता ! सत्वर आतां धीट होउनी ऊठ वरी १५

शुनिगांव; श्रावण शु० ३ शके १८४४.

## जग हें द्विविध आहे.

[ चाल—साकी ]

हंसणारे हंसतील अह्मांवर रुसणारे रुसतील ।
पर्वा त्यांची करुनि न नर हा कर्तव्यास त्यजील ॥ १ ॥
सर्व लोक चालत्या मनूचे वदतिल दोहिं तऱ्हांनीं ।
कोण तयांचीं मनें राखण्या शकेल कर्तव्यांनीं ? ॥ २ ॥
दान धर्म करि त्याला लोकीं उधळा जन ह्मणतात ।
कंजुष ह्मणती न करि तयाला तेच फिरुनि लोकांत ॥ ३ ॥
साधा करितां पोषाक जगीं ह्मणति तयास भिकारी ।
करितां निर्मळ कपडे उलटी तीच जीभ वदणारी ॥ ४ ॥
साधुत्वाचे नियम पाळितां ह्मणती व्यर्थ पसारा ।

निंदा करिती न करूं जातां कोठेंच नसे थारा ॥ ५ ॥
नाहीं द्रव्य तयाला ह्मणती निर्धन भारी नीच ।
धनिकाला तोऱ्यांत चालला ह्मणति फिरुनियां तेच ॥ ६ ॥
अपुल्या मार्गें निवांत जातां ह्मणती गर्वित झाला ।
सलगीनें बोलतां बोलती जन वाचाळ तयाला ॥ ७ ॥
उपदेश करूं जातां ह्मणती वदनीं बडबडणारा ।
अपुला धंदा नकळत करितां ह्मणति बसुनि खाणारा ॥ ८ ॥
खाया आला काळ बोलती जातां आप्त गृहाला ।
नच जातां बोलती उलट ते गर्व तयाला झाला ॥ ९ ॥
पुस्तकांतला ह्मणती कीटक अभ्यास करूं जातां ।
किंवा ह्मणती मूर्ख तयाला अभ्यासाविण असतां ॥ १० ॥
प्रवास करितां भटक्या ह्मणती लोभ विचित्र जगींचे ।
न करूं जातां चूल-कोंबडा बोलति अपुल्या वाचे ॥ ११ ॥
संसाराच्या मार्गीं जातां किंमत कोण न ठेवी ।
संन्यासी बनतां ते म्हणती भिकारडा गोसावी ॥ १२ ॥
विवेक-बुद्धि स्मरुनि वागणें जगांत एकच हीत ।
परि जनतेची पर्वा ठेउनि वागति मूढ जगांत ॥ १३ ॥
खांबीर पण मीं द्विविध जगाची पर्वा नच ठेवीन ।
मनांत भरल्या सरळ आपुल्या मार्गानें जाईन ॥ १४ ॥

मालवण.

कार्तिक व० ९ शके १८४१.

## राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें!

[ दिंडी. ]

टिळे पट्टे लावितां नायकांचे ।
घरीं होती पण हाल बायकांचे ॥
छानछोकीला कोण मान देतें ? ।
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ १ ॥
अतां सोडा ती झाकपाक सोडा ।
देशकार्यीं तेवढें वित्त जोडा ॥
सदुद्योगीं घालवा जीवितातें ।
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ २ ॥
व्यर्थ कपडे घालितां सात आठ ।
नटवराचा करुनियां नीट थाट ॥
बोळ गल्ली जातां फिरावयातें ।
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ ३ ॥
पुढें केंसांची झूल राखियेली ।
भांग परताया वेळ सर्व गेली ॥
भांग गांजा गांजिती शरीरातें ।
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ ४ ॥
बसुनि खातां घटघटां चहा सोडे ।
त्रासकारी पायांत बूट जोडे ॥
डौल मोठा नव दावितां जगातें ।
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ ५ ॥

बाह्य केला झळफळा तुम्हीं फार ।
परी तव तें गेहांत नसे सार ॥
व्यर्थ भुलतां कपड्यांस मांदिलातें ।
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ ६ ॥
स्वत्व गेलें डोकीस हॅट घाली ।
धोतराच्या जागीं तुमान आली ॥
नका भाळूं परकीय अक्कडीतें ।
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ ७ ॥
नाद ज्यांना फार जे जे जुगारी ।
जाहले ते ते सर्वही भिकारी ॥
झुगारावें ऐशिया जुगारातें ।
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ ८ ॥
पहा तुमचे ते ऐटदार फेटे ।
वरी मोत्यांचे घोंस तुरे मोठे ॥
लुब्ध झालां शर्टास तुमानीतें ।
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ ९ ॥
तुम्हीं खातां भात पोळ्या तुपाशीं ।
परी शेजारी तळमळे उपाशीं ॥
कोट जाकिट घडियाळ तोष देतें ।
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ १० ॥
पहा बटणें तव गोल सुवर्णाचीं ।
फार किमतीचीं पाच--माणकांचीं ॥

तऱ्हतऱ्हेच्या माळलां दागिन्यांतें ॥
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ ११
मिशांचा तो तव कलप, कामिनीया ।
बस्म, साबण, अंगास रंग वाया ॥
चला सोडा त्या ऐष-अत्तरांतें ।
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ १२ ॥
तुम्हां चुटके लाविती चटक भारी ।
प्रहसनें जाणा सर्वथा विषारी ॥
नाच नाटक चित्तास भ्रष्टवीतें ।
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ १३ ॥
प्रेमरस-युत कादंबऱ्यांस टाका ।
नेकटायी कॉलरी दूर फेंका ॥
खरे झालां साहेब दर्शनातें ।
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ १४ ॥
पर्ण-खेळाचे दूरकरा पत्ते ।
तसे दारूचे सोडुनि द्या गुत्ते ॥
तुम्हीं घेतां बाहेर दिसतसे तें ।
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ १५ ॥
सुरा-मित्रांला रंक मार देती ।
मुलें बोलुनि अपशब्द पाठ घेती ॥
पडुनि मार्गीं झुंजतां गटारांतें ।
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ १६ ॥

करीं घेतां ग्लासें शराब-पेले ।
धरीं अंगावर काय ठेवियेलें! ॥
घुरगडीतें सोडोनि घ्या विडीतें ।
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ १७ ॥
धूम्रपानानें रक्त सडुनि गेलें ।
युग्म ओंठांचें कृष्ण-वर्ण झालें ॥
पंडुरोगाचें धाम शरिर होतें ।
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ १८ ॥
त्यजा चंची ती लाज तुम्हां नाहीं ।
पानखाऊ भिंतीस छडे देई ॥
कोपऱ्यांतुनि थुंकून घाण होते ।
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ १९ ॥
दंतपंक्ती ते लाल चिरे होती ।
कीट जंतू त्यांच्यामधें रहाती ॥
निकट बसवेना घाण ये तयातें ।
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ २० ॥
नको हुक्का निर्धार करा पक्का ।
आळसाचें तें धाम असे तक्का ॥
सर्व सोडा वाईट संवयीतें ।
राष्ट्र व्यसनांनीं रसातळा जातें ॥ २१ ॥

मालवण; पौष शु० १२ शके १८४१

## वसंत-वैभव.

चाल—फटका.

ऋतु वसंतीं मोद मनासी खाया मिळती वन्य-फळें।
उपास नसती जीवावरती भिकाऱ्याची भूक पळे ॥ १ ॥
आंबे काजू फणस पिकुनियां घमघमाट सुटला सारा।
सारीं घेउनि पोरी बाया दूर चालल्या बाजारा ॥ २ ॥
पिकल्या करवंदांनीं केल्या काळ्या झाळी रानांत ।
कुणबी यांचीं मुलें लाविती फुलें तोडुनी कानांत ॥ ३ ॥
झाडां झुडपां फुटुनि पालवी अरण्य हिरवें गार दिसे ।
सुटती सोसाट्याचे वारे जंगल सारें डोलतसे ॥ ४ ॥
रविचे पडतां किरण तयांतर नव पल्लव ते लकलकती ।
फांद्यांवरती फांद्या झडपुनि झडपुनि भूमीवर पडती ॥ ५ ॥
वेलींच्या अंगांवर माळा वृक्षशिरांवर छान तुरे ।
हिरवे शालू पांघरती तीं करिती नानापरि नखरे ॥ ६ ॥
प्रातः काळीं कोकिळ गाती गाणें कानीं गोड शिरे ।
दुबळीं दुःखें जाउनि हृदयीं उत्साही आनंद भरे ॥ ७ ॥
खरखराट तो दाट दुपारीं घामाची नच धार खळे ।
कुठचें डुंबायाला पाणी प्यायाला बच थेंब मिळे ॥ ८ ॥
हळदिकुंकवा वांटिति सधवा आप्तमैत्रिणी जमल्यातीं ।
अडवुनि धरितां दारीं लाजत नवऱ्याच्या नांवा घेती ॥ ९ ॥
हळद फांसिती गालांवरती सखयांना देती वाणें ।
देवदर्शनें घ्याया जाती जमून बाया पुण्यमनें ॥ १० ॥
पुढती येई लग्नसराई वैशाखाचें वैभव तीं ।

जांत्यावरती अभिनव युक्ती मंजुळशीं गाणीं गाती ॥ ११ ।
सुंदर मंडप श्रृंगारियले वरी पताका हार तुरे ।
राजपथांतुनि नवऱ्यांसंगें मिरवति घोड्यांवर नवरे ॥ १२ ।
वाजंत्रांचा खणखणाट अतिदाट वाजतो चोहिंकडे ।
वसंत ऋतुचें गाणें साचें सनईतुनि कर्णांत पडे ॥ १३ ॥

मुनिगांव; चैत्र व० १० शके १८४४.

## भाविक मनाची गुणगुण.

[ चाल—दिंडी. ]

जन्म माझा मागील व्यर्थ गेला ।
कोण येतो मज उद्धरावयाला ? ॥
कोण देवा गुरुराज दिला मातें ।
मला पतिताला उद्धरावयातें ॥ १ ॥
मना माझ्या लागली थोर व्याधी ।
कृपेनें ती तव दूर करीं आधीं ॥
काय सांगूं तुज त्रास या मनाचा ।
मिळत नाहीं लवलेश शांततेचा ॥ २ ॥
पुण्यकर्मीं सेवनीं आड येई ।
न्याय नीती-नैपुण्य नीट नाहीं ॥
असें संसारीं खात सदा गोते ।
कसें प्रेम न तुज प्रेममया येतें ? ॥ ३ ॥

मालवण; श्रावण व० १२ शके १८४१

## अदृश्यसृष्टि.

चाल—ह्मातारी आली.

दृश्य जशीं आह्मीं ।
तैशीं अदृश्यशीं कोणी ॥
सृष्टिमधें असती ।
कुटुंबें अह्मांस नच दिसती ॥ १ ॥
सुधारणा त्यांची ।
आमुच्यासमान थाटाची ॥
आस्तित्व तयांचें ।
असे अदृश्य जगा साचें ॥ २ ॥
मार्गातुनि जाती ।
त्यांचे मार्ग दृश्य नसती ॥
गूढ रूप त्यांचें ।
असे अदृश्यताच साचें ॥ ३ ॥
आकार न त्यांचा ।
दृश्य, परि विकार हृदयांचा ॥
त्यांचें संगीत ।
मनोहर ऐकूं नच येत ॥ ४ ॥
अदृश्यांचें तें ।
गान का ऐकाया येतें? ॥
व्यवसाय तयांचे ।
गूढ परि अपार जगताचे ॥ ५ ॥

अगतीं वावरती ।
परी तीं कुणास नच दिसती
अदृश्यांची ती ।
असे अदृश्य चालरीती ॥ ६ ॥
बंधन रूढींचें ।
ठाउकें तयां न जन्माचें ॥
सौख्यभरें असती ।
सदा ते नांदत भूवरती ॥ ७ ॥
स्वातंत्र्याच्या ते ।
नांदतां गिरिशिखरावरते ॥
इतिहास तयांचे ।
थक्क करितीत्र जगा साचे ॥ ८ ॥
अदृश्य बनावें ।
तदा अदृश्या जाणावें ॥
मुळाखती त्यांच्या ।
होउनी अदृश्य ध्यायाच्या ॥ ९ ॥

मालवण; कार्तिक शु. १० शके १८४२.

## माहेर घर!

[ चाल—भाव धरा रे. ]

संसाराला । हा जीव विटुनियां गेला! ॥ धृ. ॥
देह वाइट माझें घर ।
नाना रोग व्याधी ज्वर ।
संतत होती पीडाकर
मूळ--घराला । मी जातें माहेराला! ॥ १ ॥
काम क्रोध मद मत्सर ।
ऐसे चौघे माझे दीर ।
मजला त्रास देती फार ।
मूळ-घराला । मीं जातें माहेराला! ॥ २ ॥
आशा सासु मोह सासरा ।
यांचा दुःसह होतो मारा ।
मजला क्षणहि न देतीं थारा ।
मूळ-घराला । मीं जातें माहेराला! ॥ ३ ॥
चिंता नणंद मोठी खर ।
हृदयावरती मारी शर ।
तिजला सासूचा आधार ।
मूळ-घराला । मीं जातें माहेराला! ॥ ४ ॥
नाना दुःखांचे डोंगर ।
चढून झालें मीं जर्जर ।
जळला भिकार हा संसार ।

मूळ-घराला । मीं जातें माहेराला! ॥ ५ ॥

मुनिगांव; फाल्गुन व० १ शके १८४४.

## कर्म-फल.

[ चाल—अभंग ]

सर्व तुझी सत्ता गर्व खाई लाथा ।
ताठा धरूं जातां नमविशी ॥ १ ॥
मी मी म्हणे नर इतरांसी त्रासी ।
जाचणी तयासी घडविशी ॥ २ ॥
रचि अहर्निशीं डोंगर पापांचे ।
फळ केलियाचें भोगविशी ॥ ३ ॥
संपत्तिचा तोरा मिरवी लोकांत ।
तया गरिबींत लाजविशी ॥ ४ ॥
असोनियां घरीं धर्म नच करी ।
तया दारोदारीं हिंडविशी ॥ ५ ॥
अंध दुबळ्यांची करुणा न जया
वेळोवेळीं तया जाणविशी ॥ ६ ॥

मुनिगांव; फाल्गुन शु० ३ शके १८४४.

## तुजविणें मम जीवन हें कमी!

[ वृत्त—द्रुतविलंबित. ]

तवपदीं मम हें जडुंदे मन ।
जडुनि भाव घडो दृढ सेवन ॥
अजवरी जगतीं जरि दंग मीं ।
तुजविणें मम जीवन हें कमीं! ॥ १ ॥
विपुल वस्तुविधांवर भाळतों ।
मृगजळास पिण्याप्रति धांवतों ॥
बहकलों वळलों कुपथास मीं ।
तुजविणें मम जीवन हें कमीं! ॥ २ ॥
सुवसनीं नटलों थटलों किती ।
तुजसि विस्मरलों, त्यजिं सत्कृती ॥
करिं सदा विविधापरि ढंग मी ।
तुजविणें मप जीवन हें कमी! ॥ ३ ॥
रत सदा स्वहितीं स्वसुखा झटें ।
कुकटचा जगतीं मिरवें नटें ॥
फरक पाड अशा मम जीवनीं ।
तुजविणें मम जीवन हें कमी! ॥ ४ ॥

मुनिगांव.

वैशाख व० ११ शके १८४५

ग्रंथ संग्रह नं. ता.

## आत्म-बल.

चाल—झातारी आली.

आत्मबलाचे दोर ।
तोडी कोणकुणाचा पोर? ॥
वीरकोटिचा जोर ।
न बनूं शके तया शिरजोर! ॥ १ ॥
मनगटांतला जोर ।
जातो पळून देहापार ॥
शस्त्रास्त्रांची धार ।
मोडे; रणें भिकारी घोर! ॥ २ ॥
वीरांच्या बनणार ।
बोंथट तलवारी अनिवार ॥
आरमार लढणार ।
होतो पोरांचा बाजार! ॥ ३ ॥
तोफांचा भडिमार ।
केवळ फटाकड्यांचे बार ॥
कार्या सिद्धीकार ।
एक तें; नसे तया प्रतिकार! ॥ ४ ॥

मुनिगांव; ज्येष्ट व० १२ शके १८४५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. नं. ........ ना. ........

## कां इथें रखडसी?

[ चाल—चल सख्या जिवारे ]

चढ जिवा तुवां वैभवावरी ।
कां इथें रखडसी अशापरी ? ॥ धृ० ॥
गिरिवरि वितळे स्फटिकासम हिम ।
इच्छा तीही तुझी खरी ॥
तूं गूढ जगाचा अवतारी ! ॥ चढ० ॥ १ ॥
वारा वाहे, सूं सूं सूं हे- ।
सूर काढिसी तयावरी ॥
तूं गूढ जगाचा अवतारी ! ॥ चढ० ॥ २ ॥
तुफान दर्या घर्घर गर्जे ।
प्रचंड शक्ती तुझी खरी ॥
तूं गूढ जगाचा अवतारी ! ॥ चढ० ॥ ३ ॥
सागरिं उसळे लाट भयंकर ।
कला निर्मिली तुवां खरी ॥
तूं गूढ जगाचा अवतारी! ॥ चढ० ॥ ४ ॥
गगनीं फिरती मेघ मनोहर ।
रंगविले तूं तयां परी ॥
तूं गूढ जगाचा अवतारी ! ॥ चढ० ॥ ५ ॥
वीज चमकते तेज तुझें तें ।
नाद घुमविसी तयांतरीं ॥
तूं गूढ जगाचा अवतारी! ॥ चढ० ॥ ६ ॥

सर सळसळते वाऱ्यावरती ।
गाणें गासी तुवां परी ॥
तूं गूढ जगाचा अवतारी! ॥ चढ०॥ ७ ॥
आकाशींचे अनंत तारे ।
दीप लागले तुझ्या घरीं ॥
तूं गूढ जगाचा अवतारी! ॥ चढ०॥ ८ ॥
जगतालागीं जिवंत ठेवी ।
प्रेम असें हें त्वदंतरीं ॥
तूं गूढ जगाचा अवतारी! ॥ चढ०॥ ९ ॥
धन्य जिवा ! ह्या मूर्त कृती तव ।
मात कळतसे मला खरी ॥
तूं गूढ जगाचा अवतारी! ॥चढ०॥ १० ॥

झुर्नगांव; आषाढ शु० ३ शके १८४५.

## 'तो क्षण!'

[चाल—नृपममता०]

जों माझें मीपण नुरलें ।
जग माझ्यामध्यें जिरलें ॥
दृष्टींत विश्व हें भरलें ।
केधवां यायचा आहे। तो क्षण ?॥ १॥
अंधारें अनंत भरलें ।

वा प्रकाश सारें झालें ॥
कांहींच न कोडें उकले ।
केधवां यायचा आहे। तो क्षण ? ॥ २ ॥
जों कोठें जग हें कांहीं ।
मीं मजला माहित नाहीं ॥
नाहीं वा होय न राही ।
केधवां यायचा आहे ।तो क्षण? ॥ ३ ॥
नच वर वा खालीं कळतें ।
जग टाकुनि जागा पळते ॥
नसण्यामधिं असणें मिळतें।
केधवां यायचा आहे । तो क्षण ? ॥ ४ ॥
तम द्युतींत मिसळुनि जाणें ।
पोकळीमधें स्थल विरणें ॥
दुःखांत मोद विरघळणें ।
केधवां यायचा आहे । तो क्षण? ॥ ५ ॥
वाऱ्यांतुनि स्वत्व वहाणें ।
नादांतुनि पोंहत जाणें ॥
मन विचार सोडुनि असणें ।
केधवां यायचा आहे । तो क्षण ? ॥ ६ ॥

मुनिगांव; आषाढ शु० १२ शके १८८१.

## नखऱ्यावर उतारा.

[अभंग]

लोऱ्यामयें जातो थाटांत वर्ततो ।
पोषाक करीतो नानापरी ॥ १ ॥
अहंकार फार ताठ धरी शिर ।
फेट्यावरी जर काढीतसे ॥ २ ॥
रंगविले ओंठ तोंडांत चिरूट ।
केशपटी नीट बैसविली ॥ ३ ॥
बूट गळपट्टी हातामध्यें काठी ।
सोन्याची अंगठी पांची-बोटीं ॥ ४ ॥
मिशा आभाळास अत्तराचा वास ।
टिकली भाळास लावीतसे ॥ ५ ॥
रेशमाचा कोट उघडें जाकीट ।
त्यांत किट किट नाद करी ॥ ६ ॥
ऐशा ढंम-ज्वरा जाण्यासी उतारा ।
पायींचिया मारा गालफडीं ॥ ७ ॥

मुनिगांव; माघ शु० २ शके १८४४

## सात्विक सृष्टिशोभा.

[वृत्त— शा विक्रीडित]

पाहें उंच कडे, दऱ्या चहुंकडे, ओढे पुढें वांकडे ।
झाडें दाट, बडे तरू बिलगण्या गेलेत मेघांकडे ॥
पर्णांनीं तरु फार फार नटले, ओढे जळें दाटले ।
झालों तल्लिन दुर्विचार सगळे माझ्या मनीं आटले ॥ १ ॥
जाती ते निघुनी प्रवाह करितां घर्घर अशी गर्जना ।
वेली वृक्षतती कितीक लवती माझ्या जणूं वंदना ॥
फांद्यांनीं मज घालिती तरुवरें वायू जसा विंझणा ।
भूपा सेवक सेविती परि उणा या सृष्टिसेवेविना ॥ २ ॥
पक्षीवर्ग वरी वरी उडुनियां मारी भरारी नभीं ।
येती मागुति कांहिसे परतुनी जाती मला वंदुनी ॥
पाहोनी मम मान सर्व करितां सृष्टी, सुखें हांसलों !
चिच्छक्ती तंव चेतवोनि सगळ्या वृत्तींविना जाहलों ॥ ३ ॥
लागे पाउस सत्वरी झिमझिमा, सूर्य प्रकाशे वरी ।
तेजानें जलबिंदु ते चमकती मोत्यें हिरे ज्यापरी ॥
झाला मोद मला ह्मणून उठलों हातीं तयां घ्यावया ।
हातीं येति न ते, निराश करिती जाती निघोनी लया ॥ ४ ॥
झालें अंबर तांबडें हळुहळू शोभा दुणावे वरी ।
कांती ना जगतांत रम्य दुसरी अस्तास जातां हरी ॥
सृष्टी सुंदर रम्य पाहुनि मनीं ऐश्वर्यशक्ती उठे ।
नाहीं वर्णन त्या अवर्णनिय तें चित्ता करी गोमटें ॥ ५ ॥

मालवण, श्रावण व० ५ शके १८४१

## ग्रीष्म-गान.

[चाल— फटका]

उत्साहाचा वसंत जातां गर्जत घुसतो ग्रीष्म ऋतू ।
तप्त महीला शांत करूं ये अहा! तयाची मौज कथूं ॥ १ ॥
मेघांच्या नव पंक्ती येती नभोमंडलीं घडघडती ।
मुलेंमाणसें पोरेंबाळें कर्णीं पडतां नाद भिती ॥ २ ॥
अंधाराच्या रातीं सुंदर नभीं चमकती वीज दिसे ।
चंद्राचा नच पत्ता यास्तव दिवे लाविती देव असे ॥ ३ ॥
केव्हां झिम् झिम् पाउस पडतो ओढे नाले खळखळती ।
केव्हां येती सरी सपाट्या वाऱ्यावरती सळसळती ॥ ४ ॥
उतार भूमीवरुनि वाहती लाल जलाचे ओघ किती! ।
तळ्या खांचरें तलाव सारीं तुडुंब झालीं सरपुरतीं ॥ ५ ॥
लाल पुराचें पाणी वाहे सरिता पळती वेगानें ।
हिरवळ चित्ता तोषविताहे हिरवीं झालीं वनरानें ॥ ६ ॥
शेतांवरती कुणबी फिरती शेत आपुलें नांगरिती ।
धान्य पेरिती धरणीवरती अंकुर हिरवे मग रुजती ॥ ७ ॥
झटपट घेतो उरकुनियां तो पुढें पेरणी शेतकरी ।
गडी माणसें नेउनि नंतर नडणीला आरंभ करी ॥ ८ ॥
ग्रीष्म ऋतुचें गाणें गातां पाउस करितो साथ बरी ।
सळसळ वाजे खळखळ वाहे मजा मिरवते महीवरी ॥ ९ ॥

मुनिगांव; ज्येष्ट शु० ११ शके १८४४

मराठी ग्रंथ स... नं. ... ठाणे.

## मुरली-रव.

[ चाल—चंद्रकांत राजाची. ]

संध्या अपुलें साम्राज्य करी रवि अस्ता गेला ।
धेनु निघाल्या होत्या सगळ्या घरास जायाला ॥ १ ॥
तोंच मुरलिची नाद-लकेरी कानावर पडली ।
स्थावर जंगम सृष्टि जंगलीं स्थिर सगळी झाली ॥ २ ॥
धेनु मागुत्या वळल्या झाल्या स्थिर जागीं जागीं ।
विहग कोटरा जातां वरती आकाशांत उगी ॥ ३ ॥
माता येइल आतां ह्मणुनी पोरें किलबिलती ।
वेणु नाद परिसतांच सारें विसरुनि गेलीं तीं ॥ ४ ॥
आणिक होती आज पौर्णिमा चंद्र वरी आला ।
स्थिरावला तो क्षणभर तेथें ऐकत मुरलीला ॥ ५ ॥
धांवत सुटले कृष्ण फुंकितां कुंजवनीं मुरली ।
चित्त-सौख्य आनंद मिळाला आस नसे उरली ॥ ६ ॥
उंचठिकाणीं उंच शिळेवर दोन पाय तिठिले ।
मुरलिस लावी फुलें शिरावर सुमन-तुरे खुलले ॥ ७ ॥
रूपा पाहुनि सर्वत्रांची वृत्ति त्यांत मुरली ।
सभोंवतालीं धेनु वासरें स्थिर ऐकत झालीं ॥ ८ ॥
सुवर्ण-सुंदर मुकुट शोभतो गळां कुसुम-माला ।
वेड मनाला लागे परिसुनि मुरलीच्या बोलां ॥ ९ ॥
राधागौळण भुलली तो हा मुरलीचा नाद ।
भुलवि जगाला रमवि मनाला उठतां पडसाद ॥ १० ॥

गोप-कन्यका धांवति ऐकुनि मुरलीच्या नादा ।
तसे धांवले मृगगण वनिंचे त्या गाई पयदा ॥ ११ ॥
नभांत बसुनी विमानांतुनी परिसति सुर सारे ।
आनंदानें डुलत मुरलिच्या प्याले सुरसा रे ॥ १२ ॥
मुलें सोडुनी घरें पाहती वनास जायाला ।
रात्र जाहली यास्तव माता झटति फिरविण्याला ॥ १३ ॥
शुभ्र चांदणें पडे चोंकडे काय सुशोभा ही ।
मुरलीचा हा नाद मनोहर काय मौज पाहीं ॥ १४ ॥
श्रीहरिच्या या असेंच पायां सान्निध बैसावें ।
सुधातुल्य हें माधवजीचें गाणें परिसावें ॥ १५ ॥
भूक तान हरपली मनींची चिंता मावळली ।
प्राण विसावा मनांत माझ्या भरला वनमाळी ॥ १६ ॥
प्रेम-सागरा भरती आली अफाट हृदयांत ।
सांग ह्मणसि तर कानीं सांगिन हृदयाची बात ॥ १७ ॥
अशापरीनें कुजबुजती साऱ्या पोरी पोरी ।
आनंदाची लाट पसरली चार-दिशां सारी ॥ १८ ॥
जिकडे जो तो डोले त्या मुरलीच्या नादांत ।
कुठेंच रानीं वाऱ्यानें नच हले पान पात ॥ १९ ॥
हृदयाचीं उघडलीं कपाटें खडबडलें आंत ।
मनास पटलें प्रकट जहालें आत्मरूप त्यांत ॥ २० ॥
आशा फिटति निराशा उठती ठाणें सोडून ।
मधुर मुरलिच्या नादें गेले वेडे होऊन ॥ २१ ॥

कोण पावतिल दिव्यानंदा जगांत या साधू ।
कसें हांसवी जगत् नाचवी मुरलिंत ही जादू! ॥ २२ ॥

मुनिगांव; कार्तिक व० १३ शके १८४३.

## नको ऐशांचें तर्पण!

[अभंग]

जरी गांव खाती सारा। परि तृप्ति न अंतरा ॥
अहंपण झालें अती। वडेजाव दाखविती ॥ १ ॥
नाहिं मराठींत गती। ये ना संस्कृताची पोथी ॥
हक्क आमुचा ह्मणती। वेतना साठीं भांडती ॥ २ ॥
म्हणताती आह्मीं मोठे। परि कृतीनें उलटे ॥
दिसे भाविकसें ध्यान। परि लबाडिंत मन ॥ ३ ॥
घर भरोनियां गळे। परि भिक्षेचे डोहाळे ॥
खांदिं टाकोनी पडशी। येति दारांत भिक्षेसी ॥ ४ ॥
जग कमी होतां त्यांत। देत्यांवरी रुसतात ॥
नको ऐशांचें तपण। होति पितर पतन ॥ ५ ॥

मुनिगांव; पौष शु० २ शके १८४४

## पॅंवगा.

[ साकी ]

पॅांह पॅंवग्या पाण्यावरती तरंगणारा तूंच ।
स्वच्छंदानें स्वैरपणानें करिसी नाना नाच ॥ १ ॥
ठावा जो नच मानवलोकीं थोर मुनिश्रेष्ठांला ।
यावा कैसा तुला बोल तो मंत्र मग जपायाला ॥ २ ॥
सांगुनि दे मज मंत्र तुझा तो गुरू तुला मीं केला ।
पाण्यावरती तुझ्यापरी मज हवें तरंगायाला ॥ ३ ॥
आवडतो मज स्वैरपणा, तुज मीं गाणें गाईन ।
प्रसन्न करुनी तुला एकदां समजुनि तो घेईन ॥ ४ ॥
थांब जरा तूं पॅांह असा ये मजला पाहायास ।
नाचत राहें असाच येथें, कवन करूंदे यास ॥ ५ ॥
मम गाण्याला तव नाचाला ताळ बसूं देशील ।
तर मग माझ्यासमान तूंही तल्लिन रे होशील ॥ ६ ॥
किंवा तूं मुक्तात्मा असशिल कोणी दिव्य पुरूष ।
स्वच्छंदानें येशी इकडे जलकेली करण्यास ॥ ७ ॥
शिकव तरी पण मंत्र तुझा मज वंद्य गुरू तूं साच ।
शिष्य तुझा मीं होउनि राहिन जन्मावर ऐसाच ॥ ८ ॥
उठेन येथुनि तुझ्याकडुनि तो शिकवुनि जों घेईन ।
मग पाण्यावर मींहि तुझ्यापरि तरंगून राहीन ॥ ९ ॥

मुनिगांव; कार्तिक शु० १४ शके १८४३.

## काहींतरी.

चाल—उद्धवा शांतवन.

सत्पदा मिळविण्यासाठीं ।
मार्गांत सदांचा गामी ॥
तो विचार माझ्या पोटीं ।
करिं प्रयत्न संतत ते मीं ॥ १
कां विचित्र मजला वेड ।
का संभ्रम चित्ता झाला ॥
दिवस हा आजचा गोड ।
होणार काय अपणाला ॥ २ ॥
का तथ्य असे याच्यांत ।
तें कुणास कोठें ठावें ॥
आज मीं बसेन रथांत ।
कीं पुण्यक्षेत्रा जावें ॥ ३ ॥
का वैभव-शिखरावरती ।
जाऊन बसायाचा मीं ॥
सरणार मनाची आर्ति ।
कीं उगाच अंतर्यामीं ॥ ४ ॥

मुनिगांव; कार्तिक शु० १२ शके १८४३.

ग्रंथ संग्रहालय ठाणे

## लढाईवर जातांना—

चालः— अजि अक्रुर हा.

जा बाळा रे शौर्ये समरा जाई ।
विजयश्री मिळवुनि येई ॥
जीवनदाते टाकुनि तुजला गेले
स्वर्गीचे राजे झाले ॥ १ ॥
तूं भूवरचा राजा त्यांच्यामागें ।
कर्तव्या अपुल्या जागें ॥
हें राज्य तुझें प्रजा तुझी ही सारी ।
तूं तुझाच रे मुखत्यारी ॥ २
हे गलिम तुझ्या आले राज्यावरते ।
जे थरथर कांपत होते ॥
ते तिकडेच्या मरणा ऐकुनि येती ।
त्यां ठेवीं घालुनि भीती ॥ ३ ॥
लढ ऐसा कीं शत्रू परतुनि जाती ।
पसरेल जगावर कीर्ती ॥
तव कीर्ती ते स्वर्गावर ऐकून ।
कौतुकें डुलविती मान ॥ ४ ॥
ह्या सैन्याची भिस्त तुझ्यावर सारी ।
जा त्यांचा होईं पुढारी ॥
हे तुजकरितां प्राणहि अपुला देती ।
त्यां वागविं ठेवुनि प्रीती ॥ ५

जा विजय तुझ्या भाळीं लिहिला आहे ।
रणधुरा शिरावर वाहें ॥
जा बाळा रे मानुं नकोस विषाद ।
माझा तुज आशीर्वाद ॥ ६ ॥

मुनिगांव; ज्येष्ट शु० ११ शके १८४९

## गर्वा नको तूं चढूं!

[वृत्त- शा- विक्रीडित ]

लाटा गर्जुनियां असंख्य उठती रत्नाकराच्या वरी
जाती मागुनि लागल्याच विलया कोणी न पर्वा करी
तैशा भूवरती पिढ्यांवर पिढ्या जन्मास येवोनियां
जाती लोपुनियां कुणा न कळतां पोटांत काळाचिया १
जन्मा येउनियां मरे मरुनियां जन्मा पुन्हा येतसे
काळाचें फिरतेंच चक्र कधिंही हें थांबणारें नसे
मृत्यूच्या वदनीं किती नर जगीं आतांवरी पातले
किंवा यापुढती कितीक जगतीं जन्मास येती भले २
याचें काढुनि मोजमाप किमपी कोणी न ठेवीतसे
किंवा तो इतिहास कोण न कधीं लेखावयाला बसे
जन्मा येत असे कुठें कुणितरी कोठील खेड्यामधें
कैसा वाढतसे कुठें फिरतसे त्या लक्ष कोणी न दे ३

खातो पेरुनि धान्य भूवर कुठें वार्ता न कोणास ही
विद्या काय, कशास कीर्ति म्हणती ठावी न त्याला सही
राहे बांधुनि झोंपडी तिजमधें तैसाच कोठेंतरी
मेल्यानंतर तोंड सांडुनि खुलें कोठें पडे भूवरी ४
नाहीं दाद जगास ही पण असे, तैशीच पर्वा नसे
माशा त्यावरती बसोनि करिती स्वच्छंद 'घों घों' असें
गेला जों नच एक दीस पुरता मेल्यावरी बापडा
तों ती काय खुशाल चाळित असे नाना तऱ्हेचा किडा ५
ते तें पोखरिता शरीर अवघें आतूनियां आणिकें
त्याची ती मग दुर्दशा न जगतीं कोणीच वर्णू शके
तैशीं घेउनियां भयंकर पशू दाढेंत हाडें भलीं
खातां फोडुनियां पहा कुनशिबा सीमा नसे राहिली ६
नाहीं होउनि येवढें सुटतसे दुर्दैव-रेषा भली
कर्माची नच भोगणें ग्रहदशा अद्यापही संपली
त्याचें पूर्ण सुधारकास मिळता तें कातडें तेधवां
त्याचा होत असे तयार पुढती रंगीत जोडा नवा ७
एकादा मग तो तरूण पुढती पायांत घालूनियां
छाती काढुनियां पुढें तरतरां लागेल चालावया
तैसा आणिक घट्ट मार्ग असतां तो घातलेला खडू
दुर्दैवास तयाचिया कळस हा, गर्वा नको तूं चढूं ! ८

मुनिगाव फाल्गुन व० १० शके १८४३.

—:÷*÷:—

## स्वत्वाची जाणिव

[वृत्त— द्रुतविलंबित.]

ह्मणसि 'हे मम नेत्र' असें जरी ।
मग तुवां दुसराच कुणीतरी ॥
मग ममत्व तयांपरतें उरे ।
वळख त्या अपुल्या स्वरुपासि रे ॥ १ ॥

ह्मणसि 'हे मम कान' असें जरी ।
धनि तुवां असशील तयां तरी ॥
जड समस्त वृथा अवडंबरें ।
वळख त्या अपुल्या स्वरुपासि रे ॥ २ ॥

ह्मणसि हे मम हस्तपदादिक ।
असति तूं मग त्यांहुनि आणिक ॥
भ्रमपथांतुनियां परता सरें ।
वळख त्या अपुल्या स्वरुपासि रे ॥ ३ ॥

शरिर तूं अपुलें ह्मणतोस ना? ।
मग शरीर तुवां असशील ना ॥
शरिर आणिक आपण भिन्न रे ।
वळख त्या अपुल्या स्वरुपासि रे ॥ ४ ॥

मन तुझें ह्मणसी पुसतांक्षणीं ।
मग मनास तुवां असशी धनी ॥
तुजहुनी मन भिन्न असें ठरे ।
वळख त्या अपुल्या स्वरुपासि रे ॥ ५ ॥

ग्रंथ संग्रह नं. ता.

शरिर तूं नच तूं नच इंद्रियें ।
असासि चालक मालक त्यां स्वयें ॥
वगळुनी शरिराप्रत तें उरे ।
वळख त्या अपुल्या स्वरुपासि रे ॥ ६ ॥
करुनि खातर घे अपुली जवें ।
शरिर धी मन यांतुनि तूं नव्हे ॥
हृदयिं तूं, असती शरिरें घरें ।
वळख त्या अपुल्या स्वरुपासि रे ॥ ७ ॥
म्हणसि हीं सगळीं अपलीं असें ।
मग स्वरूप तयांहुनि ही वसे ॥
स्वरुप शब्द न वर्णिति हें खरें ।
वळख त्या अपुल्या स्वरुपासि रे ॥ ८ ॥
स्वरुप तें नच धी वळखूं शके ।
नच मनास कळे इतुकें तुकें ॥
सकल मोह--विकार करीं पुरे ।
वळख त्या अपुल्या स्वरुपासि रे ॥ ९ ॥
कर धडा मनिंचा 'नच देह मी' ।
सकल जाइल दूर निघोन भी ॥
मग प्रभुत्व जगीं अपुलें उरे ।
वळख त्या अपुल्या स्वरुपासि रे ॥ १० ॥

मुनिगांव, पौष शु० १२ शके १८४३

## मिळव कीर्ति जगीं!

वृत्त—द्रुतविलंबित.

जगतिं वस्तु सुमोहकशा जरी ।
मिळविण्यास न यत्न वृथा करीं॥
बहुत कष्टवुनी स्वशरीर तें ।
मिळव कीर्ति जगीं, चढ मान्यते ॥ १ ॥
विफल हा भव यांत रमूं नको ।
मिळविल्याविण नांव मरूं नको ॥
बहुत कष्टवुनी स्वशरीर तें ।
मिळव कीर्ति जगीं, चढ मान्यते ॥ २ ॥
सुख- विलास- निमग्न असूं नको ।
कर विशेष जगांत, बसूं नको ॥
बहुत कष्टवुनी स्वशरीर तें ।
मिळव कीर्ति जगीं, चढ मान्यते ॥ ३ ॥
करित दुःख मनांत पिचूं नको ।
धर समुत्कट धैर्य, खचूं नको ॥
बहुत कष्टवुनी स्वशरीर तें ।
मिळव कीर्ति जगीं, चढ मान्यते ॥ ४ ॥

मुनिगांव; आषाढ व० ५ शके १८४४.

## नसे वेळ ऐशी पुन्हा यावयाची.

[वृत्त— भुजंगप्रयात.]

स्वदेशास स्वातंत्र्य या द्यावयाला ।
महावीर कोणी पुढें जो जहाला ॥
अनुज्ञा करा एकभावें तयाची ।
नसे वेळ ऐशी पुन्हा यावयाची ॥ १ ॥
करी यत्न देशास जो उद्धाराया ।
झटे जो महा ताप दुःखें हराया ॥
गुरू तो बरा बोधवाणी तयाची ।
नसे वेळ ऐशी पुन्हा यावयाची ॥ २ ॥
खरा कार्यकर्ता असा जो मिळाला ।
बघोनी अनाचार जो क्षुब्ध झाला ॥
करी यत्न तो आत्मवित्तास खर्ची ।
नसे वेळ ऐशी पुन्हा यावयाची ॥ ३ ॥
सदा जो ह्मणे ऐक्यभावेंच नांदूं ।
समत्वीं समधान मानूं न निंदूं ॥
करा जागृती तो म्हणे मानसाची ।
नसे वेळ ऐशी पुन्हा यावयाची ॥ ४ ॥

मुंबई ; मार्गशीर्ष व० १४ शके १८४२.

## शिमगा.

[ चाल-दिंडी ]

नको आशा ही व्यर्थ तमासाठीं ।
तमाशांच्या कां लागतसां पाठीं? ॥
नका मांडाचे नीच खेळ खेळूं ।
नका साळू मैना असे टवाळूं ॥ १ ॥
तुम्हीं देतां हे पाठ लहानातें ।
कां न व्हावें मग भ्रष्ट वदा नातें ॥
नका धिंगा घालून बोंब मारूं ।
नका हातीं लागेल तसें चोरूं ॥ २ ॥
नको होळी शिमग्यास शिव्यागाळी ।
आर्य नांवातें फांसतसां काळी ॥
नीच गाणीं लोकांत कशीं गातां? ।
भ्रष्ट आचरणें शुद्ध करा आतां ॥ ३ ॥
शिव्या देउनि मार्गांत बोंब केली ।
नीच बोलुनि अपशब्द धडे घाली ॥
कांस ओढोनी पाडितसां खालीं ।
अनीती ही तव लाज कुठें गेली ? ॥ ४ ॥
तुम्हीं बहकुनि रंगांत ढंग केले ।
धरुनि सोंगें दारांत उभे ठेले ॥
स्मरुनि कर्मे वर्मांत धरुनि बोटे ।
नको मत्सर तव नांव बुडुनि गेलें! ॥ ५ ॥

नको गोडी ह्या नाचतमाशांची ।
नको आशा दुष्पापवासनांची ॥
घरीं बाजारीं नाचतसां नाचे ।
जळो थू तें कोठार अनीतीचें! ॥ ६ ॥

मालवण; फाल्गुन व० ३० शके १८४१

## ऐक्यभाव.

—शार्दूलविक्रीडित—

झालें मन्मन निर्विकार नुरला माझ्यामधें मीपणा ।
आहे शांति मनांत पूर्ण भरली संतृप्त मीं याक्षणा ॥
सत्प्रेमें भरुनी नुरें किमपि, मीं दुःखोदधीतें तरें ।
नाहीं भेद तुझ्यांत आणि उरला माझ्यामधें श्रीहरे ॥ १ ॥
ना भीती मजला, न कोण मजला भीती कधीं यापुढें ।
सर्वां मानुनि देव, भाव धरिला सर्वांस पायां पडें ॥
पर्वा ना मजला जगांत उरली दुर्वासना लोपली ।
गर्वाला नच ठाव, पुण्य मन हें सर्वांस मानीं भलीं ॥ २ ॥
नाहीं सौख्य मला, न दुःख मजला, दुःखासि या दुःख मीं ।
नाहीं धर्म मला, अधर्मि हि न मीं, धर्मामधें मर्म मी ॥
रोगांना खररोग मींच भुवनीं सर्वांमधें ठाकलों ।
नाहीं पुण्य मला, न पाप मजला, मीं ही नसे जाहलों ॥ ३ ॥

मालवण; ज्येष्ठ व० ८ शके १८४१.

## देशासाठीं--

[ वृत्त—मंदाक्रांता. ]

देशासाठीं झिजत मम हा देह राहो सदांचा ।
देशासाठीं सुरस कविता बोलुंदे नित्य वाचा ॥
देशासाठीं मजकडुनियां भाषणें प्रौढ व्हावीं ।
देशासाठीं सतत लिहुनी पुस्तकें मीं रचावीं ॥ १ ॥
देशासाठीं मजकडुनियां थोर कार्यें घडावीं ।
देशासाठीं धन तनु तशी देशकार्यीं पडावी ॥
देशासाठीं हृदय मम हें काळजी नित्य वाहो ।
देशासाठीं झिजत असतां देहही नष्ट होवो ॥ २ ॥
देशासाठीं जगुनि जगतीं साधुता आचरावी ।
देशासाठीं अविरत मला लोकसेवा घडावी ॥
देशासाठीं जनन मम हें जाहलें जीव आहे ।
देशासाठीं मुकुनि स्वसुखा देशचिंतेस वाहें ॥ ४ ॥

मालवण; कार्तिक शु॰ ३ शके १८४२

## अनुकरण.

[ चाल—झातारी. ]

कवि बुधजन झाले । जगीं ह्या थोरपदा चढले ॥
ऐकुनियां वाटे । मनीं आनंद फार दाटे ॥ १ ॥
थोर तसें व्हावें । जगीं नांवा संपादावें ॥
जन्माला यावें । मागुती कीर्तिस ठेवावें ॥ २ ॥
नरपण मनुजाचें । नरासम नरें करायाचें ॥
आजवरी वहिवाट । असा हा जगताचा परिपाठ ॥ ३ ॥
कवि तुकया साधू । लागला हरिचरणां शोधूं ॥
त्यासि अनुसरावें । वाटतें मनीं एकभावें ॥ ४ ॥
दिव्य मनाचें-बोल । माझ्या हृदयीं शिरले खोल ॥
रामदास- स्वामी । बनावा असें वाटतें मीं ॥ ५ ॥
स्वामि-विवेकानंद । देती चित्ताला आनंद ।
वाजतसे पांवा । राखिलें धर्माच्या नांवा ॥ ६ ॥
पढवुनि उपदेशा । घेववी संन्यासी-वेषा ॥
अनुगमन तयांचें । वाटतें मला करायाचें ॥ ७ ॥
मोहनदासांची । कीर्ति ह्या थोर असे साची ॥
शिकवुनि नव पेशा । लाविला सन्मार्गीं देशा ॥ ८ ॥
देशाचा उद्धार । कराया गांधींचा अवतार ॥
अनुकरण घडो तें । सदांचें मनांत ह्या येतें ॥ ९ ॥
स्वातंत्र्याचा कंद । फिरतो हिमाचलीं स्वच्छंद ॥
'राम' नाम गाजे । योगि तो कालाला साजे ॥ १० ॥